

स. ग्रं. मं. ठाणे

REFBK-0006001

श्रीमत् स्वामी रामानंद

# जीवन-कथा

लेखिका

कै. गंगूबाई खेडकर, बी. ए.

प्रकाशक

श्री. पी. पी. भडकमकर,
B. Sc. (America)
M.S.C.I., (England)

REFBK-0006001

प्रकाशक :

श्री. पी. पी. भडकमकर,
४१५ शनवार पेठ,
सरस्वती-भुवन, पुणें २.

सर्व हक्क प्रकाशकानें आपल्याकडे ठेविले आहेत.

३०,००० प्रती काढीत आहोंत.

मुद्रक :

श्री. र. राजगुरु,
राजगुरु प्रेस, ४०५ नारायण,
कॉमनवेल्थ कॉलनी, पुणें २.



कै. गंगूबाई खेडकर,

जी. ए.

# लेखिकेचा अल्प परिचय

लहानपणीं शिक्षण मिळालें नसतांहि, स्वतःची मानसिक उन्नति करून घेण्याच्या तळमळीमुळें, ज्यांनीं प्रौढ वयांत सांसारिक जबाबदाऱ्यांचें ओझें वाहत असतांनाच अनेक अडीअडचणींना तोंड देऊन शिक्षण घेतलें, व अशा रीतीनें संपादन केलेल्या आपल्या ज्ञानाच्या द्वारें पुढें शक्त्यनुसार समाजसेवा केली अशा, गेल्या पिढींतील महाराष्ट्रीय विदुषीं-मध्यें या पुस्तकाच्या लेखिका कै. गंगूबाई खेडकर यांची गणना होते.

आपल्या प्रौढ वयांत त्यांनीं शिक्षण घ्यायला सुरुवात केली व मोठ्या चिकाटीनें कॉलेजच्या अभ्यासक्रमापर्यंत मजल मारून: कर्व्यांच्या इंडियन वुइमेन्स युनिव्हर्सिटीमधून त्या जी. ए. झाल्या.

कॉलेजमध्यें त्यांनीं तत्त्वज्ञान व तुलनात्मक धर्म या विषयांचा अभ्यास केला होता. या अभ्यासाची त्यांना त्या वेळीं लागलेली गोडी त्यांच्या पुढील आयुष्यांत अधिक अधिक वाढत गेली याचें एक कारण म्हणजे उच्चविद्याविभूषित असे त्यांचे पति कै. डॉ. आर्. व्ही. खेडकर, एम्. डी., एफ्. आर्. सी. एस्., डी. पी.एच्., एल्. आर्. सी. पी. वगैरे—– यांचेहि धर्म व

तत्त्वज्ञान हे आवडीचे विषय होते हें होय. या विषयांचा कै. डॉ. खेडकर यांचा एवढा दांडगा व्यासंग होता, कीं त्यांनीं त्यांच्या पुष्कळ ग्रंथांपैकीं "अद्वैतिझम्" नांवाचा एक ग्रंथ फार श्रम घेऊन इंग्रजींत प्रसिद्ध केला आहे.

१९११ मध्यें कै. गंगूबाई खेडकर या आपले पति डॉ. खेडकर यांजबरोबर इंग्लंडच्या व अमेरिकेच्या प्रवासावर निघाल्या. त्या वेळीं या दोन्ही देशांत ठिकठिकाणीं त्यांनीं 'गीता' व 'वेदान्त' या विषयांवर व्याख्यानें दिलीं. त्यांचीं हीं व्याख्यानें तेथें फार लोकप्रिय होऊन, तेथील वर्तमानपत्रांमध्यें त्यासंबंधीं गौरवपर लेख प्रसिद्ध झाले. **अशा रीतीनें युरोप-अमेरिकेमध्यें जाऊन हिंदी तत्त्वज्ञानाचा तेथील जनतेला परिचय करून देणाऱ्या या पहिल्याच हिंदी विदुषी होत.**

कै. गंगूबाई खेडकर यांचें कांहीं आयुष्य पुण्यांत गेलें. त्या वेळीं त्यांनीं समाजसेवेच्या निरनिराळ्या क्षेत्रांमध्यें महत्त्वाचा भाग घेतला.

आपल्या मुलांबाळांसंबंधीं कौटुंबिक कर्तव्यें चोख रीतीनें बजावून, समाजसेवेमध्यें भाग घेऊन, शिवाय त्या स्वतःची आध्यात्मिक उन्नति करून घेण्यांतहि नेहमीं तत्पर असत.

त्यांच्या या आध्यात्मिक मनःप्रवृत्तीमुळेंच श्रीमत् स्वामी-रामानंद यांच्या परिचयाचा त्यांना लाभ होऊन पुढें स्वामीजींच्या ठिकाणीं त्यांची भक्ति जडली.

स्वामी रामानंद यांजविषयीं त्यांना एवढा पूज्यभाव वाटत होता कीं, वेळोवेळीं स्वामीजींच्या गतायुष्यासंबंधीं, त्याचप्रमाणें त्यांच्या पारमार्थिक अनुभवासंबंधीं माहिती गोळा करण्याचें त्यांचे प्रयत्न नेहमीं चालू असत. या सर्व माहितीचा उपयोग करून स्वामीजींचें चरित्र लिहावयाचें व तें लोकोपयोगाकरितां प्रसिद्ध करावयाचें अशी त्यांची मनीषा होती, पण ती पुरी होण्यापूर्वींच दुर्दैवानें एकाएकीं पक्षघाताच्या विकारानें आजारी पडून गेल्या जूनमध्यें त्यांचा अंत झाला.

कै. गंगूबाई खेडकर यांनीं लिहून ठेवलेलें स्वामी रामानंद यांचें हें चरित्र, आहे त्या त्रोटक स्वरूपांत प्रसिद्ध केलें तरी सुद्धां मुमुक्षुवर्गाला तें मार्गदर्शक होईल असें वाटल्यावरून तें आज आम्हीं प्रसिद्ध करीत आहोंत.

— प्रकाशक

# प्रस्तावना

जगांत राज्यत्याग आणि संन्यास या गोष्टी क्वचितच एकत्र आढळतात. राज्याचा त्याग करून संन्यासवृत्ति धारण करण्याला मनुष्याच्या अंगीं असामान्य मनोधैर्य नि निग्रह असावा लागतो. मानवी प्राणी निरनिराळ्या प्रकारचा त्याग करून स्वतःचें समाधान करूं शकतो. आत्मानंदांत रंगून जाण्याकरितां प्रत्येक मानवी प्राणी पराकाष्ठा करीत असतो; आणि जो मानव आत्मानंदांत रंगून परमात्मस्वरूपाशीं तद्रूप होतो तोच जगाचा उद्धार करूं शकतो. अशाच अवतारी पुरुषापुढें जगांतील सर्व स्त्री-पुरुष आपलें मस्तक नमवतात. जगाच्या अध्यात्मभूमींत भारतभूला अग्रत्वाचा मान मिळत आहे. आजवर भारतभूमींत अनेक महात्मे निर्माण झाले आणि त्यांनीं या देशाच्याच नव्हे तर अखिल जगाच्या अध्यात्मिक उन्नतीस हातभार लावलेला आहे. देशांत सर्वत्र अश्रद्धा आणि जडतावाद यांचें थैमान सुरू झालें असतांना समाजाचें त्याच्या नाशापासून रक्षण करण्याचें व त्याला सन्मार्ग दाखविण्याचें कार्य करणारे कांहीं महात्मे या भारतभूमींत झाले आणि आजहि कांहीं महात्मे तेंच कार्य पुढें चालवीत आले आहेत. अशा महात्म्यांमध्येंच श्रीमत् स्वामी रामानंद यांची गणना केल्यास चुकीची ठरणार नाहीं असें वाटतें.

राजशाही वैभवाला शोभेल अशा लढाऊ वृत्तीच्या जमीनदार घराण्यांत श्रीमत् रामानंद स्वामी यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांना मोठ्या मानाची :सरकारी नोकरी होती. तेव्हां आपल्या लाडक्या मुलानें आय्. सी. एस्. होऊन आपल्या-प्रमाणेंच सरकारी नोकरी पत्करावी असें त्यांना वाटणें स्वाभाविकच होतें. Man proposes and God disposes असें म्हणतात तेंच श्रीमत् रामानंदस्वामी यांच्या बाबतींतहि घडून आलें. वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षींच सुबोधचंद्रांच्या—श्रीमत् रामानंद स्वामींच्या मातेनें, सरलादेवीनें, इहलोकची यात्रा संपवली. या घटनेचा अर्थातच त्यांच्या बालमनावर विलक्षण परिणाम झाला. आपल्या मातेच्या शोकांत निमग्न असतांनाच 'जगज्जननीलाच तूं आपली आई मान. ती कधीं-सुद्धां तुला सोडून जाणार नाहीं' असें सुबोधचंद्रांच्या वडिलांचे स्नेही एक दिवस त्यांना सहज म्हणाले. पण या शब्दांनींच त्यांच्या आयुष्यांत क्रांति घडवून आणली. सुबोधचंद्रांच्या हृदयांतील वैराग्याचें बीज जागृत झालें व अखेर त्यांनीं आपल्या गृहाचा त्याग केला. नोकराशिवाय दोन पावलेंहि न टाकणाऱ्या सुबोधांनीं गृहत्याग करून वाट फुटेल तिकडे जाण्याचें निश्चित केलें व ते प्रथम चीन देशाकडे गेले.

जगज्जननीच्या चिंतनाशिवाय दुसरा कोणताच विचार त्यांच्या मनांत नसल्यामुळें त्यांना हिंस्र श्वापदांची भीति वाटली नाहीं. खाण्यापिण्याकडे अगर स्वतःच्या शरीराकडे

कोणत्याहि प्रकारें त्यांचें लक्ष राहिलें नव्हतें. झाडाची कोंवळी पालवी खाऊन व झऱ्याचें पाणी पिऊन जगज्जननीच्या चिंतनांत सुबोध दिवस कंठूं लागले. जंगलांत त्यांच्या जिवावरचे प्रसंग पुष्कळ आले होते, परंतु सर्व प्रसंगांतून ईश्वरी करणीमुळेंच त्यांचे प्राण बचावले. सुबोधचंद्रांनीं आठ महिने त्या जीव धोक्यांत असणाऱ्या अरण्यमय व डोंगराळ भागांत घालविले. त्यांचें सारें चित्त जगज्जननीच्या साक्षात्काराकडे लागलेलें होतें. अशा वेळीं देहत्याग करावा असें त्यांच्या मनानें घेतलें आणि एकदोनदां तर त्यांनीं तसा प्रयत्नहि केला; परंतु एका अज्ञात इसमानें त्यांना दोन वेळां वांचविलें. आपल्याला वांचविणारा भिल्ल हाच परमेश्वर असला पाहिजे असें त्यांच्या मनानें घेतलें व त्याचे आपण पाय धरले नाहींत म्हणून त्यांना नंतर फार वाईट वाटलें.


नंतर कांहीं दिवस त्यांनीं चीनमधील फुंगी लोकांच्या संगतींत घालविले. फुंगी साधु स्त्रियांजवळून भिक्षासुद्धां घेत नाहींत. केवळ ते शरीरपोषणापुरतेंच माध्यान्हानंतर अन्न-ग्रहण करतात. निष्कांचन राहण्याचा नियम त्यांना कडक रीतीनें आयुष्यभर पाळावा लागतो. ते सारा वेळ ईश-चिंतनांत घालवितात. अशा या फुंगी साधूजवळ हिंस्रपशु देखील गरीब गाईसारखे वागतांना सुबोधचंद्रांना दिसले. फुंगी लोकांच्या विहारांमध्यें त्यांना निरनिराळीं भयंकर चित्रें

दिसत असत व पुष्कळ वेळां भासहि होई. येथें सहासात महिने राहून त्यांनीं योगसाधन व प्राणायाम यांचा अभ्यास केला व नंतर ते भमोस आले. येथें त्यांची व वडिलांची अचानक भेट झाली. कांहीं दिवस भमोस राहिल्यानंतर वडिलांनीं त्यांना मंडाले येथें आणलें व शाळेंत घातलें. परंतु सुबोधचंद्रांचें सारें लक्ष जगज्जननीच्या भक्तीकडे होतें. ते चार वेळां घर सोडून गेले व सर्व वेळां त्यांचा तपास करून वडिलांनीं त्यांना घरीं आणलें. ‘ घरीं राहूनहि तुला साक्षात्कार होईल. ईश्वर कोठें दूर नाहीं, तो तुझ्या अंतर्यामींच आहे ’ असा उपदेश त्यांच्या वडिलांनीं केला व त्यांनीं बांधून दिलेल्या एका गुहेंत सुबोधचंद्र राहूं लागले. परंतु त्यांच्या मनाला तेथें स्वतंत्रता वाटेना व ते एक दिवस नवद्वीप येथें गेले.

त्या नवद्वीपांत श्रीचैतन्यप्रभूच्या नामसंकीर्तनांत सुबोधचंद्र आपला वेळ घालवूं लागले. कांहीं दिवसांनीं ते प्रयागला आले. येथें त्यांना अध्यात्मज्ञानाची प्राप्ति झाली. त्रिवेणीसंगमावर त्यांना सच्चिदानंद परमहंस यांनीं संन्यासदीक्षा दिली व तेव्हां-पासून सुबोधचंद्र हे श्रीरामानंदस्वामी या नांवानें ओळखले जाऊं लागले. या वेळीं त्यांचें वय अवघें १४ वर्षांचें होतें. कांहीं दिवसांनंतर ते कैलासपर्वतावर गेले. वाटेंत त्यांचे गुरुबंधु नारायणस्वामी हें त्यांना भेटले. अत्यंत हालअपेष्टा सोसून

अखेर या दोघांनीं—नारायणस्वामी व श्रीरामानंदस्वामी यांनीं—कैलासशिखर गांठलें. येथें त्यांची व एका प्रभावी महात्म्याची भेट झाली. या महात्म्याच्या गुहेच्या दारांत अन्नपाण्याशिवाय पंधरा दिवसपर्यंत श्रीरामानंदस्वामी बर्फावर बसून होते. इतकें झाल्यावर त्या महात्म्यानें त्यांना आशीर्वाद व उपदेश दिला. नंतर गुरूची आज्ञा घेऊन ते मानस सरोवराला आले. तीन वर्षांच्या तपश्चर्येनंतर त्यांना देवीचा साक्षात्कार झाला.

त्यानंतर श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या शिष्या रुमादेवी व श्रीरामानंदस्वामी यांची धारचूला येथें भेट झाली. भूतान येथील लक्षाधीश खुशालसिंग यांच्या विनंतीवरून व्यास चौदासला श्रीरामानंदस्वामी राहूं लागले. येथें स्वामीजी एकंदर तीन वर्षेंपर्यंत राहिले. एकदां दहा-पंधरा फूट बर्फ आश्रमावर व आजूबाजूच्या भागावर पडलें. त्यांतून खुशालसिंग यांनीं बऱ्याच भूतानी लोकांच्या साहाय्यानें श्रीरामानंद स्वामीजींस बेशुद्धावस्थेंत बाहेर काढलें व रुमादेवी यांच्या आश्रमांत नेलें. पुढें शुद्धीवर आल्यावर कांहीं दिवसांनीं श्रीरामानंदस्वामी व म्हैसूरचे महाराज यांची भेट झाली. महाराजांच्या खास आमंत्रणावरून रुमादेवी व श्रीरामानंदस्वामी म्हैसूरला आले. कांहीं दिवसांनंतर ते बडोद्यास गेले. स्वामीजींनीं अनेकांना अध्यात्मज्ञान प्राप्त करून दिलें आहे व त्यांचा शिष्यगण फारच मोठा आहे. केवळ भौतिक सुखाच्या मागें



श्री. पी. पी. भडकमकर,

B. Sc. ( America )

M. S. C. I. ( England )

लागून आपल्या आध्यात्मिक विकासाकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ति सध्यां मानवजातीमध्यें दिवसेंदिवस वाढत चालली आहे व त्यामुळें मानवसमाज दुःखाच्या गर्तेत अधिकाधिक खोल जात चालला आहे, त्याला सावरून धरण्याचें कार्य श्रीमत् रामानंदस्वामी यांनीं आपल्या आध्यात्मिक ज्ञानाच्या बळावर चालविलें आहे. आणि अशा थोर विभूतीचा परिचय महाराष्ट्रांतील, स्वतःच्या प्रौढ वयांत शिक्षणास सुरुवात केलेल्या एका भगिनीनें करावा हें विशेष होय. आज श्रीमत् रामानंदस्वामींचा परिचय करून देणाऱ्या लेखिका कै. गंगूबाई खेडकर, जी. ए., या हयात नाहींत हें आपलें दुर्दैव होय! परंतु हें पुस्तक त्यांची वेळोवेळीं समाजाला आठवण करून दिल्याशिवाय राहणार नाहीं अशी खात्री आहे.

प्रकाशक

ता. १४-१-४१

पुणें.

रामानंदप्रभूंची कृपा तूं पाही। सद्गुरावीण गति
मिळत नाहीं ॥ धृ.॥
बालवयीं ते घर सोडोनी। पहुडुन रानीं
कुशी निजुनी। ईशा मनीं तो निशीदिनीं ध्याई ॥ धृ ॥१॥
गाई श्रीहरि श्रीहरि म्हणुनी। नमुन भेटे जळीं
उठोनि घेई। ईशा धावे येऊनि तेव्हांहीं ॥ धृ ॥ २॥
ध्रुवचरित्रा कथुनी दावी। सकल त्यासी हृदयीं
बिंबवुनी। भक्ति जीवाला भिववुनी देई ॥३॥.

गंगाबाई खेडकर.

## श्रीमत् स्वामी रामानंद

# जीवनकथा

६०.०९

## विषय-प्रवेश

एकदां कोणा एका राजाच्या मनाला वैराग्य प्राप्त होऊन त्यानें आपल्या राज्याचा त्याग केला व संन्यास घेऊन दूर एका अरण्यांत जाऊन तेथें तो परमार्थचिंतनांत आपला सर्व काळ घालवूं लागला.

संन्यास घेतलेल्या या राजाची गोष्ट दुसऱ्या एका राजाच्या कानांवर गेली व तो या संन्याशाच्या भेटीला आला व मोठ्या आदरानें त्यानें आपलें डोकें त्याच्या पायांवर ठेवलें. तें पाहून त्या संन्याशानें राजाला प्रश्न केला, "माझ्या पायांवर तूं डोकें ठेवलेंस याचें कारण काय?"

राजानें उत्तर केलें, "महाराज, हें काय विचारतां? एवढें मोठें राज्य व सर्व सुखोपभोग यांचा मोह सोडून आपण संन्यासदीक्षा घेतली! केवढा हा आपला त्याग! आपला हा त्याग पाहून मला वाटणाऱ्या आपल्याविषयींच्या पूज्यभावामुळेंच मीं आपल्या चरणांवर डोकें ठेवलें!"

यावर संन्यासी म्हणाला, " राजा, माझा त्याग मोठा एवढ्याचकरतां जर तूं माझ्या पायांवर आपलें डोकें ठेवलें असशील, तर तें तुझें करणें चुकीचें आहे. कारण तुझा त्याग माझ्या त्यागाहून किती तरी पटींनीं मोठा आहे ! "

संन्याशाच्या या शब्दांनीं राजा बुचकळ्यांत पडला व म्हणाला, " आपण म्हणतां ती गोष्ट मला पटत नाहीं, तरी ती मला नीट समजावून सांगा ! "

हें ऐकून संन्याशानें राजाला विचारलें, " राजा, समज दोन माणसें आहेत. त्यांपैकीं एका माणसानें आपल्या घरांतला केरकचरा बाहेर फेकून दिला, पण आपल्या घराचा त्याग केला नाहीं; दुसऱ्या माणसानें आपल्या घरांतला केरकचरा बाहेर न फेकतां तो तेवढा जवळ बाळगला व घराचा त्याग केला, तर या दोघांपैकीं मोठा त्याग कोणाचा म्हणायचा ? " राजानें लगेच उत्तर दिलें, " अर्थात् ज्या माणसानें केरकचरा तेवढा जवळ बाळगून त्या मानानें अत्यंत मोठ्या मोलाची वस्तु अशी जी घर, त्या घराचा ज्यानें त्याग केला त्याचा ! "

एवढीं प्रश्नोत्तरें झाल्यावर शेवटीं आपला आशय स्पष्ट करण्याकरतां संन्यासी म्हणाला, " ज्या कारणानें घरांतला केरकचरा बाहेर टाकून देऊन घराचा त्याग न करणाऱ्या माणसाच्या त्यागापेक्षां केरकचरा तेवढा जवळ बाळगून घराचा त्याग करणाऱ्या माणसाचा त्याग मोठा ठरतो, त्याच

कारणानें तुझा त्याग माझ्या त्यागाहून शेंकडों पटींनीं मोठा आहे. कारण घराच्या मानानें घरांतल्या केरकचऱ्याला जेवढें कमी महत्त्व, तेवढेंच मानवी देहांत वास करणाऱ्या प्रत्यक्ष परमात्मस्वरूप अशा आत्म्याच्या मानानें या मानवी देहाला आहे. हा माझा आत्मा विशुद्ध स्थितींत ठेवावा, त्याचें नीट जतन करावें, म्हणून मीं माझ्या देहावरील आसक्ति कमी केली, देहभावाचा त्याग केला, याचा अर्थ वरील दाखल्यांतील केरकचऱ्याच्या मोलाएवढा क्षुल्लक वस्तूचा मीं त्याग केला असा होतो. उलट तूं त्या देहाला—त्या केर-कचऱ्याच्या किमतीच्या वस्तूला जवळ बाळगण्याकरतां त्याहून अनंत पटींनीं अधिक मौल्यवान् अशा आपल्या आत्म्याची उपेक्षा करतोस, म्हणजे तुझी ही कृति केरकचरा जवळ बाळगून घराचा त्याग करणाऱ्या माणसाच्या कृतीसारखीच आहे. अर्थात् तुझा त्याग माझ्या त्यागाहून अनंत पटींनीं श्रेष्ठ आहे व म्हणून आपणांपैकीं कोणी जर दुसऱ्याच्या पायांवर त्याच्या त्यागीपणाबद्दल डोकें ठेवायचें झालें तर मींच तुझ्या पायांवर डोकें ठेवणें योग्य होईल!" या जगांत ज्या मानवांच्या नशिबीं आत्मानंदांत रंगून जाण्याचें महद्भाग्य असतें, अशा सत्पुरुषाची आत्मविकाससंबंधीं किती उदात्त भावना बनलेली असते याचें ही गोष्ट ही एक उत्तम दर्शक आहे. अशा या उच्च भावनेनें जे सत्पुरुष आपल्या देहा-

भिमानाचें निर्मूलन करून सर्व वासनांचे पाश तोडून परमात्मस्वरूपीं तद्रूप होतात, ते आत्मकल्याणाबरोबरच जगदुद्धाराचें महत्कार्यहि घडवून आणतात. म्हणूनच अशा पुरुषांना महात्मे किंवा अवतारी पुरुष मानून त्यांच्याकडून मिळालेल्या आत्मिक ऋणाबद्दल त्याजपुढें मस्तक अवनत करायला जगाला धन्यता वाटते.

जगाची अध्यात्मभूमि ठरलेल्या या भारतभूमींत वेळोवेळीं असे अनेक महात्मे निर्माण होऊन त्यांनीं या देशाच्याच नव्हे तर अखिल जगाच्या आध्यात्मिक उन्नतीस हातभार लावलेला आहे. कालमानाप्रमाणें जगांतील इतर देशांप्रमाणेंच या आपल्या देशांतहि सर्वत्र अश्रद्धा व जडतावाद हीं बेसुमार बोकाळून समाजाला नाशाच्या मार्गाकडे नेत असतां त्यापासून समाजाचें रक्षण करण्याचें व त्यास सन्मार्ग दाखविण्याचें कार्य करणारे असे महात्मे, समाजाचे आध्यात्मिक गुरु सुदैवानें आजहि आपल्याला लाभलेले आहेत. अशाच एका सत्पुरुषाची—श्रीमत् स्वामी रामानंद यांची—जीवनकथा या पुस्तकाच्या द्वारें वाचकांस सादर करण्याचें ठरविलें आहे.



श्रीमत् स्वामी रामानंद

# जन्म व बालपण

श्रीमत् रामानंदस्वामींचा जन्म पूर्व बंगालमध्यें फरिदपूर जिल्ह्यांतील एका प्रख्यात जमीनदार घराण्यांत १९१३ सालीं झाला. हें जमीनदार घराणें प्राचीन काळापासून एवढें ऐश्वर्यसंपन्न व सत्ताधारी होतें कीं ब्रिटिश राजवट सुरू होण्या-पूर्वीं या घराण्यांतील संपत्तीचा अपहार करण्याकरतां मोंगल सुभेदार या जमीनदारीवर कांहींतरी कुरापत काढून चढाई करून येत. अशा प्रसंगीं स्वतःच्या धनदौलतीचें व इभ्रतीचें रक्षण करण्याकरतां या घराण्यांतील शूर पुरुष स्वतःजवळ सैन्य बाळगीत व त्या सैन्यासह व शस्त्रास्त्रसामुग्रीसह नेहमीं सज्ज राहून या जुलमी सुभेदाराशीं बेधडक दोन हात करीत. अशा बाहेरच्या हल्ल्यापासून स्वतःचें रक्षण करतां येईल अशीच, ज्या घरांत हें घराणें वंशपरंपरा राहत आलें आहे, त्या घराची रचना व बांधणी आहे. हें घर एखाद्या राजवाड्या-सारखें भव्य व प्रशस्त असून त्याच्या चोहोंबाजूंस तीनचार फर्लांग रुंदीचा पाण्याचा खंदक आहे. या खंदकावर एक लोखंडी पूल असून, या वाड्यावर शत्रूचा हल्ला झाला असतां पाहिजे तेव्हां तो काढून घेतां येईल, अशी त्याची रचना आहे. त्याशिवाय या वाड्याला अतिशय मजबूत अशी तटबंदी असून तटावरून खंदकापलीकडील शत्रूवर बंदुकींचा

मारा करतां येईल, अशी योजना केली आहे. या घराण्याच्या लढाऊ वृत्तीचें दर्शक असें हें या वाड्याचें स्वरूप असलें, तरी या इतिहासप्रसिद्ध जमीनदार घराण्याच्या राजशाही वैभवाला शोभेल असें सौंदर्यहि त्यांच्या या निवासस्थानामध्यें भरपूर आहे. कारण या वाड्याच्या खंदकाच्या चारी बाजूंना सुंदर दगडांचा घाट बांधलेला असून, या खंदकांतील स्वच्छ नीलवर्ण पाण्यामध्यें नेहमीं कमळें फुललेलीं असतात. शिवाय या पाण्यामध्यें जलविहार करतां यावा म्हणून अनेक सुंदर नौका नेहमीं तयार ठेवलेल्या असतात. या खंदकाला लागून आंत-बाहेर पुष्पवाटिका व नारळी-पोफळींच्या बागा उभ्या आहेत व या बागांपलीकडे खंदकाच्या चारी बाजूंना घनदाट जंगल राखलेलें आहे.

अशा या गर्भश्रीमंत व खानदानी घराण्यांत अव्वल ब्रिटिश अमदानींत प्रल्हादचंद्र नांवाचे जमीनदार होऊन गेले. यांनीं आपल्या कर्तबगारीनें आपल्या जमीनदारीच्या लौकिका-मध्यें व संपत्तीमध्यें फार मोठी भर घातली. ब्रिटिश राजसत्ते-मुळें निर्माण झालेला नवा मनु लक्षांत घेऊन प्रल्हादचंद्रांनीं, संपत्तीच्या धुंदींत अज्ञानाला चिकटून राहिलेल्या इतर जमीनदारांप्रमाणें इंग्रजी विद्येला तुच्छ लेखलें नाहीं, तर ब्रिटिश राजसत्तेमुळें निर्माण झालेल्या मन्वंतराचें महत्त्व लक्षांत घेऊन त्यांनीं आपल्या प्रकाशचंद्र या एकुलत्या एक मुलाला

उत्तम इंग्रजी शिक्षण दिलें. त्यामुळें इतर सर्वसाधारण जमीनदाराप्रमाणें वडिलार्जित उत्पन्नावर चैन करीत, आळसांत आपलें आयुष्य घालण्याऐवजीं प्रकाशचंद्र यांनीं आपला शिक्षणक्रम पुरा केल्यावर सरकारी नोकरी पत्करली. त्या नोकरींत मोठमोठ्या हुद्द्यांचीं कामें केल्यावर शेवटीं त्यांची ब्रह्मदेशांत मंडाले येथें जनरल पोस्ट मास्तरच्या जागीं नेमणूक झाली.

प्रकाशचंद्रबाबूंच्या पत्नीचें नांव सरलादेवी असें होतें. त्या अत्यंत स्वरूपवान् होत्या. शिवाय त्या सद्गुणसंपन्न व विद्या-विभूषितहि होत्या. अशा या पत्नीच्या सहवासांत सुखानें संसार करण्यांत प्रकाशचंद्रबाबूंचीं बरींच वर्षें मंडालेमध्यें गेलीं व या अवधींत त्यांना तीन मुलगे व तीन मुली झाल्या. या मुलांपैकीं सर्वांत लहान मुलगा सुबोधचंद्र—हेच आमचे चरित्र-नायक— सध्यांचे श्रीमत् रामानंदस्वामी होत.

आधींच ज़न्म एका गर्भश्रीमंत जमीनदार घराण्यामध्यें, त्यांत वडिलांच्या बड्या सरकारी हुद्द्यामुळें त्या घराण्याच्या वैभवामध्यें व मानमान्यतेमध्यें भर पडलेली, आधुनिक सुसंस्कृतपणा व विद्वत्ता यांचा लाभ झालेला अशीं मातापितरें, सहा भावां-बहिणींमध्यें सर्वांत धाकटें व लाडकें भावंड या अशा सर्वतोपरी भाग्यवान् परिस्थितींमध्यें सुबोधचंद्राचें बालपण किती सुखांत गेलें असेल, याची कल्पनाच केलेली बरी !

आपल्या पाणीदार डोळ्यांनीं, बुद्धीच्या सतेजपणाची भर पडून अधिकच सुंदर दिसणाऱ्या आपल्या मोहक चेहऱ्यानें व आपल्या गोड स्वभावानें, सर्वांचीं मनें आकर्षण करून घेणाऱ्या या मुलास पाहून, प्रकाशचंद्रबाबूंच्या घरीं येणाऱ्या त्यांच्या आप्तेष्टांनीं या मुलाचें कोडकौतुक करून एक दिवस हा मुलगा विलायतेंतील आय्. सी. एस्.सारखें उच्च शिक्षण घेऊन कलेक्टर किंवा जज्जासारखा मोठा हुद्दा संपादन करील किंवा बॅरिस्टर होऊन संपत्ति व कीर्ति मिळवील किंवा एखादा विद्वान् प्रोफेसर म्हणून साऱ्या देशांत आपलें नांव करील, असें त्याच्या पुढील आयुष्याचें उज्ज्वल चित्र त्या वेळीं रंगविलें तर तें अस्थानीं होतें असें कोण म्हणेल ?

## मातृवियोग

पण या मुलाच्या बाबतींत विधियोजना निराळीच होती. एका निराळ्याच क्षेत्रामध्यें सुबोधचंद्राला मोठें स्थान प्राप्त व्हावयाचें होतें. आणि म्हणूनच सुबोधचंद्राच्या वयाच्या दहाव्या वर्षीं या कुटुंबावर अनपेक्षित रीतीनें एक मोठीच आपत्ति येऊन कोसळली. त्याच्या मातेचा—सरलादेवीचा एकाएकीं अंत झाला ! ज्याची हानि दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीनें भरून निघणार नाहीं, असें जगांतलें सर्वांत मोठें

असें या मुलाचें सुखाचें निधान हरपलें ! ज्या आईच्या अंगाखांद्यावर बागडण्यांत इतकीं वर्षें गेलीं, ज्या आईच्या हातांनीं भरवल्याशिवाय घास गिळला नाहीं, ज्या आईच्या प्रेमळ दृष्टीखालीं अष्टौप्रहर आसरा घेतला, त्या आईचें निश्चल कलेवर पाहून सुबोधनें दुःखानें एकसारखा आक्रोश सुरू केला ! तिचा मृत देह अंत्यविधीसाठीं स्मशानांत नेण्याकरतां उचलण्यांत आला, त्या वेळीं आपणहि 'आई'बरोबर जाण्याचा त्यानें हट्ट धरला ! अशा या कोंवळ्या वयांत मृत्यूचें हें जें भयाण दर्शन व तेंहि मातृवियोगाच्या रूपानें सुबोधला झालें, त्यामुळें त्याच्या अंतःकरणाला निराळीच चालना मिळाली !

सरलादेवींच्या मृत्यूनंतर आईची आठवण काढून सुबोध एकसारखा शोक करूं लागला ! दिवस-रात्र त्याच्या रडण्याला खंड पडेना ! दिवसामागून दिवस जाऊं लागले ! कुटुंबांतल्या इतर माणसांचें दुःख ओसरूं लागलें ! पण कोणी कितीहि शांतवन केलें तरी सुबोधचें रडणें व शोक कमी होईना !

शेवटीं एक दिवस तो असाच आईची आठवण काढून रडत बसला असतां त्याच्या घरीं आलेले, त्याच्या वडिलांचे एक स्नेही त्याची समजूत करण्याकरतां त्यास म्हणाले, " बाळ सुबोध, तूं आतां तुझ्या आईला विसरून जा ! त्या तुझ्या आईहून मोठी आई, जी तुला कधींहि सोडून जाणार

नाहीं, अशी जी जगज्जननी तिलाच तूं आतां यापुढें आपली आई मान ! ती तुझ्यासमोर येईल, तुला दर्शन देईल, तुझें दुःख नाहींसें करील ! तर यापुढें आपला शोक सोडून देऊन, या मोठ्या आईचा—या खऱ्या आईचा नेहमीं धांवा करीत जा, तिचें नामस्मरण करीत जा ! ”

सुबोधची तात्पुरती समजूत पाडण्याकरतां त्या स्नेह्यानें सहज उच्चारलेल्या या शब्दांनीं केवढा आश्चर्यकारक परिणाम घडवून आणला !

वर्षाकालाच्या आरंभीं तृषार्त भूमि जितक्या उत्कटतेनें पावसाच्या पहिल्या सरी तत्काळ खोलवर शोषून घेतात, तितक्याच उत्कटतेनें सुबोधच्या जात्याच आत्मप्रवण अशा मनोभूमिकेमध्यें या साध्यासुध्या शब्दांमधलें उदात्त सत्य तत्काळ शोषलें गेलें !

यानंतर दोन चार दिवसांच्या अवधींत सुबोधच्या वृत्तींत एकदम बदल घडून आला. आईबद्दलचा त्याचा शोक त्यानें अजीबात सोडून दिला. त्याऐवजीं ‘मा’ ‘मा’ अशा हाका मारून तो माता जगदंबेचा भावार्त वाणीनें धांवा करूं लागला. दहा-अकरा वर्षांच्या या अल्प वयांतच खाणें, जेवणें व अशाच सुखसोईवरील त्याची आसक्ति पार नाहींशी झाली. पिता, भाऊ, बहिणी यांच्या प्रेमासंबंधीं औदासीन्याची भावना त्याच्या मनांत निर्माण झाली व दिवसेंदिवस वाढूं लागली.

त्याचा बाल्यसहज असा पूर्वीचा अल्लडपणा, खेळकरपणा जाऊन चिंतनशीलतेची व विवेकीपणाची प्रोक्त छटा आतां नेहमीं त्याच्या चेहऱ्यावर दिसूं लागली! पूर्वसंचितानुसार स्वभावतःच त्याच्या अंतर्हृदयांत सुप्तावस्थेंत असलेलें वैराग्याचें बीज जागृत होऊन आतां अंकुरित होऊं लागलें. सुबोधच्या आयुष्यांतील हा प्रसंग ऐकून पुराणांतील ध्रुवाची कथा कोणाला आठवणार नाहीं ? पित्याच्या मांडीवरून सावत्र आईनें खालीं ओढल्यानें झालेल्या दुःखामुळें ध्रुवाचें मन भक्तिप्रवण बनलें. ध्रुवाप्रमाणेंच, तशाच लहान वयांत सुबोधचंद्राचें मन तशाच दुःखाच्या आवेगासरशीं परमात्म-तत्त्वाकडे झुकलें गेलें. आणि ध्रुवाप्रमाणेंच या लहानशा सुबोधचंद्राला आपलें अढळपद मिळविण्याकरितां तशाच खडतर मार्गानें यापुढें जावें लागलें !

## गृहत्याग

एक दिवस सुबोधचंद्र पहाटेस उठला व बिछान्यावर झोपलेल्या स्थितींत असलेल्या आपल्या वडिलांना नमस्कार करून कोणाला न कळवतां त्यानें घर सोडलें! मैल अर्धा मैल अंतर चालावयाचें असलें तरी ज्यानें वाहनांतून जावें, बरोबर सोबतीसाठीं नोकराला न्यावें अशा परिस्थितींत

वाढलेल्या या केवळ दहा वर्षें वयाच्या मुलाला घराचा त्याग करून जवळ एक कपर्दिकाहि नसतां बेधडक वाट फुटेल तिकडे एकाएकीं निघून जाण्याचें धैर्य व्हावें, ही घटना विलक्षण नाहीं काय? निर्भयतेचें व आत्मविश्वासाचें हें सामर्थ्य या बालकाच्या मनांत एकाएकीं कसें उदय पावलें? घरांतून निघाल्यावर सुबोधचंद्रानें चीन देशाच्या दिशेनें वाट चालायला सुरुवात केली. प्रथम भामो या गांवांत तो येऊन पोंहोचला. कोणा वाटसरूचें लक्ष जाऊन त्यानें कांहीं खावयाला दिलें तर घेतलें, कधीं अर्धपोटी राहून, तर कधीं उपाशी, थंडीमध्यें कुडकुडत; ऊन्ह-पावसाचा त्रास सहन करीत, चीन देशाच्या सरहद्दीवर आल्बम नांवाचा पर्वत आहे, तेथवर तो चालत गेला. हा प्रवास करीत असतां त्याचें चित्त पूर्णपणें जगदंबामय होऊन गेलें होतें. जगदंबेशिवाय— त्या जगज्जननीशिवाय दुसरा कोणताहि विचार त्याच्या मनांत राहिला नव्हता. त्यामुळेंच या आल्बम पर्वतावरील अनेक हिंस्र पशूंनीं भरलेल्या घनदाट अरण्यांत शिरतांना स्वतःचें पुढें काय होईल ही काळजी वाटण्याइतकें स्वतःच्या शरीराचें भानहि त्यास राहिलें नव्हतें. इतके दिवस वाटेंत भेटणाऱ्या कोणा प्रवाशाकडून अधून मधून त्याला थोडेंबहुत कांहीं तरी खावयाला तरी मिळत असे, पण या पर्वतावरील निर्जन अरण्यांत शिरल्यावर तेंहि साधन नाहींसें झालें. या

अरण्यांतून भटकत असतां फारच भूक लागली, तर झाडाची कोंवळी पालवी खाऊन व झऱ्याचें पाणी पिऊन तो दिवस काढूं लागला. दिवस मावळल्यावर सिंह, वाघ, रानडुक्कर वगैरे हिंस्र श्वापदांच्या आरोळ्या त्याच्या कानांवर येत व मग झाडावर चढून तेथें तो सर्व रात्र काढी. झोपेंत झाडावरून खालीं पडूं नये म्हणून आपलें शरीर झाडाच्या फांद्यांना कपड्यानें बांधून त्या झाडावरच तो झोपीं जाई. अशा रीतीनें झाडावर चढल्यानंतर पुष्कळ वेळां झाडाखालीं व आसपास कानठळ्या बसविणाऱ्या हिंस्र श्वापदांच्या चाललेल्या गर्जनांमुळें त्याची सबंध रात्रच्या रात्र भीतीमुळें झोपेशिवायच जाई.

## जीवावरील प्रसंग

या प्रकारें जीव धोक्यांत घालून अनेक दिवस त्या अरण्यामधून मार्गक्रमण करीत असतां दिवसभर जगदंबा मातेची 'मा' 'मा' या शब्दांनीं त्याजकडून आळवणी चाललेली असे. या अरण्यांतून जात असतां त्याच्यावर एकामागून एक असे भयंकर प्रसंग आले कीं त्यांतून ईश्वरानेंच त्यास बचावलें असें म्हटलें पाहिजे.

एकदां एका उंच पहाडावरून तो खालीं उतरत होता. पहाडावर चोहोंबाजूंस इतकें घनदाट अरण्य माजलें होतें,

कीं तेथें भरदिवसां सूर्याचा प्रकाश दिसून येत नव्हता ! या अशा अरण्यांतून मोठ्या मुष्किलीनें वाट काढीत पहाडाखालीं उतरत असतां त्याच्यापासून केवळ एका फर्लांगाच्या अंतरावर एक भयंकर वाघ एका म्हशीला मारून खात असलेला त्यास दिसला. वाळलेल्या पानांवरून सुबोधचंद्र चाललेला असल्यामुळें त्या पानांचा सळसळ आवाज ऐकतांच वाघ डोकें वर करून चवताळून क्रूर दृष्टीनें त्याच्याकडे पाहूं लागला व गुरकावूं लागला. त्या वेळीं भेदरून गेलेल्या सुबोधचंद्राच्या तोंडांतून जगदंबेला उद्देशून नेहमींच निघत असलेले 'मा' 'मा' हे शब्द आपोआप उंच आवाजानें निघाले, व ते निघतांक्षणींच काय चमत्कार असेल तो असो, वाघ मागें वळला व उडी मारून झाडीमध्यें दिसेनासा झाला.

अशाच दुसऱ्या एका प्रसंगीं दुपारच्या वेळीं भूक लागल्यामुळें एका झाडापाशीं जाऊन त्याची कोंवळीं पानें तो खुडूं लागला. तों तोंड खालीं सोडून व शेपूट वर करून झाडावर लोंबकळणारी जी सापाची एक भयंकर विषारी जात असते, त्या जातीचा एक लांबच लांब साप त्या झाडाला लोंबकळत असलेला, एकदम आपली फडा उभारून व दंश करण्याकरितां फूत्कार करून त्याच्या इतका जवळ आला कीं त्याच्या फूत्काराच्या गरम उच्छ्वासाचासुद्धां त्याच्या अंगाला स्पर्श

झाला. पण सुबोधनें आपलें अंग झटकन् मागें घेतलें व सुदैवानें याहि अरिष्टांतून तो निभावला.

त्या जंगलामध्यें जागोजाग जळवा तर मनस्वी होत्या. ज्या ज्या ठिकाणीं उंच गवत वाढलें असेल, अशा ठिकाणीं त्या गवताला चिकटून या जळवा राहात व मनुष्य किंवा एखादें जनावर त्या गवताजवळ आलें कीं भराभर त्याच्या अंगावर चढून व चिकटून त्याचें रक्तशोषण करीत. सुबोधचंद्राला या जळवांची कांहींच माहिती नव्हती; त्यामुळें एकदां चुकून अशा गवतांतून तो चालला असतांना शेंकडों जळवा येऊन एकदम त्याच्या अंगाला चिकटल्या व त्याचें रक्त शोषूं लागल्या, व त्यामुळें त्याच्या अंगाला भयंकर वेदना होऊं लागल्या. सुबोधचंद्र नंतर त्या गवतांतून बाहेर निघाला व मोठ्या मुष्किलीनें अंगाला चिकटलेली एक एक जळू काढून त्यानें फेकून दिली. पण तेवढ्या वेळांत त्याच्या सर्व अंगामधून इतकें रक्त वाहूं लागलें होतें कीं, जणूं तो रक्तानें न्हाल्यासारखाच दिसत होता व त्या रक्तस्रावामुळें त्याच्या शरीरांत दोन चार पावलें चालण्यापुरतेंहि त्राण राहिलें नव्हतें.

## देहत्यागाची तयारी

याप्रमाणें अनेक हालअपेष्टा काढीत, जीव धोक्यांत घालणाऱ्या प्रसंगांना बेफिकिरीनें तोंड देत सुबोधचंद्रानें आठ

महिने त्या अरण्यमय व डोंगराळ भागांत भटकण्यांत घालविले. या अवधींत खाण्यापिण्यास कांहीं न मिळाल्यामुळें व एक-सारखा देह कष्टविल्यामुळें त्याचें शरीर अस्थिपंजरवत् झालें. या आठ महिन्यांत श्रीजगदंबेचा साक्षात्कार व्हावा ही एकच तळमळ त्याला लागली होती व त्यामुळें दिवसरात्र तिचें नामस्मरण करून तिचा तो धांवा करी. पण अजून त्याला त्या देवीचें दर्शन होईना! सर्व सुखसोयींनीं भरलेल्या आपल्या घराचा त्याग केला, आपल्याला एखाद्या फुलाप्रमाणें वागवि-णाऱ्या, स्वभावानें कमालीच्या प्रेमळ अशा वडिलांचा व अत्यंत ममतेनें आपले लाड करणाऱ्या थोरल्या भावां-बहिणींचा वियोग पत्करला, पदोपदीं येणारीं जिवावरचीं संकटें दिसत असतांहि प्राणाची पर्वा न करतां रानावनांत हालअपेष्टा सोशीत इतके दिवस काढले, तरी ती माता जगदंबा दर्शन देत नाहीं, असें पाहून तो हताश व दुःखानें वेडापिसा झाला! व शेवटीं वैतागाच्या भरांत एकदां देहत्याग करावा असा आपल्या मनाचा निर्धार करून तो एका उंच कड्यावर जाऊन उभा राहिला. त्या कड्याच्या खालीं खोल दरी पसरली होती व त्या दरीमधून एका धबधब्याचें पाणी भयंकर मोठा आवाज करीत वेगानें धांव घेत होतें. त्या ठिकाणीं स्वतःचा कडेलोट करून घेऊन स्वतःच्या आयुष्याचा शेवट करावा अशा निश्चयानें तो उभा राहिला व आतां खालीं उडी घेणार,

इतक्यांत पाठीमागच्या झाडींतून झटदिशीं कोणी भिल्ला-सारख्या रानटी जातीचा अक्राळविक्राळ स्वरूपाचा व अगडबंब शरीराचा एक मनुष्य झटदिशीं पाठीमागून आला व त्यानें याचा हात घट्ट पकडून त्या कड्याच्या कांठावरून याला दूर ओढून नेलें. “ पुनः अशी गोष्ट करूं नकोस ! ” असें त्यानें सुबोधचंद्राला दरडावून व धाक दाखवून सांगितलें व दोन-चार पावलें मागें जाऊन तेथें तो अदृश्य झाला. या रानटी माणसाच्या स्पर्शासरशीं अशी एक अननुभूत प्रकारची सुखद भावना सुबोधचंद्राच्या मनांत एकाएकीं उचंबळून आली कीं, तत्काळ त्याच्या मनांतली वैतागाची आग त्यामुळें विझून गेली व त्याच्या मनाला शांति मिळाली. ती वेळ संध्याकाळची होती. समोर पसरलेल्या डोंगरांच्या ओळीला तांबडें लाल सूर्यबिंब जाऊन भिडलें होतें. त्या मनोरम निसर्ग-दृश्यावर दृष्टि लावून सुबोधचंद्रानें पुनः भक्तियुक्त मनानें जगदंबेचें नामस्मरण सुरू केलें. सूर्यबिंब डोंगराआड दिसेनासें झालें ! दिवस मावळून बराच वेळ झाला. आसमंतात् सर्वत्र रात्रीचा गडद अंधःकार पसरला. तरी त्या दिवशीं जगदंबेच्या नामस्मरणांत तल्लीन झालेलें त्याचें मन भानावर येईना. शेवटीं आजूबाजूंच्या झाडींतून हिंस्र पशूंच्या अक्राळविक्राळ गर्जना सुरू झाल्या, तेव्हां तो सावध झाला व नित्याप्रमाणें जवळच्या एका झाडावर चढून तेथें तो झोपीं गेला.

# दुसरें संकट

पुन्हा कांहीं दिवसांनीं असा एक प्रसंग घडला कीं, त्या वेळीं हाच भिल्ल पुन्हा सुबोधचंद्राच्या साहाय्याला धावून आला. सुबोधचंद्र अरण्यांतून जात होता. एका वृक्षावर ओरांगउटांग जातीचा भला मोठा माणसाच्या आकाराचा वानर बसला होता. सुबोधचंद्राकडे नजर जातांच त्या वानरानें रागानें भयंकर रीतीनें ओरडायला सुरुवात केली व सुबोधचंद्रावर झडप घालण्यासाठीं तो धाऊन आला. सुबोधचंद्र आपला बचाव करण्याकरतां माघारा वळून धावूं लागला व तो वानर तर लांब लांब उड्या टाकीत त्याचा पाठलाग करूं लागला. इतक्यांत अकस्मात् तो पूर्वीचा भिल्ल वानर व सुबोधचंद्र यांच्यामध्यें येऊन उभा राहिला व पाठीचें धनुष्य काढून त्यानें त्या वानरावर एकामागून एक चार-पांच बाण सोडले. तो वानर नंतर घायाळ झालेल्या स्थितींत ओरडत, विव्हळत दूर झाडींत पळून गेला. अशा रीतीनें या अरिष्टांतून सुबोधचंद्राचें रक्षण केल्यावर त्या भिल्लानें जवळ येऊन सुबोधला रागानें थप्पड मारली व दरडावून बोलला, "तूं असा जंगलांत फिरूं नकोस, रानांतलें कोणी तरी जनावर तुला मारून खाईल." एवढें बोलूनच तो थांबला नाहीं. त्यानें सुबोधचंद्राचा हात पकडला व त्याला भरभरा ओढीत

त्या जंगलांतून बाहेर आणलें व नजीकच्या एका गांवाजवळ आणून सोडलें व नंतर आपण अदृश्य झाला. अशा रीतीनें निर्जन ठिकाणीं दोनदां अचानक येऊन आपलें रक्षण करणारा हा भिल्ल कोण असावा, असा विचार नंतर त्याच्या मनांत उत्पन्न झाला व त्याला खात्रीपूर्वक असें वाटूं लागलें कीं, हा भिल्ल म्हणजे दुसरातिसरा कोणी नसून, भिल्लाचें रूप घेऊन आलेला आपला पाठीराखा प्रत्यक्ष परमेश्वरच होता. त्या भिल्लाचे आपण पाय धरले नाहींत, त्याची प्रार्थना केली नाहीं, त्याला शरण गेलों नाहीं, अशा पश्चात्तापाच्या विचारांनीं सुबोधचंद्राचें मन फार व्यथित झालें. ज्या गांवाजवळ त्या भिल्लानें सुबोधचंद्राला आणून सोडलें होतें, तो चीन देशाच्या सरहद्दीवरील एक गांव होता.

## चीन देश

या गांवाहून तो चीन देशांत जायला निघाला. रोज २०-२५ मैल चालावें, रात्रीं एखाद्या गांवांत झाडाखालीं झोपावें, पुन्हा चालायला लागावें, असें करीत करीत चीन-मध्यें प्रवेश करण्याचा एक चमत्कारिक तऱ्हेचा पूल दोन पर्वतांच्या टेकड्यांमध्यें बांधिलेला आहे, तेथें तो येऊन पोंहोचला. या दोन पर्वतांमधील अंतर अर्धा मैल असून

खालीं खोल दरी पसरली आहे. या दोन पर्वतांचीं दोन टोकें एका गडगडीनें जोडलीं असून प्रवासी या गडगडीच्या आधारानें एका टेकडीवरून दुसऱ्या टेकडीवर जातात व त्या टेकडीवरून मग चीन देशांत प्रवेश करतां येतो, पण या गडगडीला धरून पलीकडे जाणें ही फार धोक्याची गोष्ट असते. सराव नसलेल्या माणसाचा थोडा कांहीं हलगर्जीपणा झाला तर खोलच्या खोल दरींत कोसळून एखाद्याच्या आयुष्याचा लगेच शेवट व्हावयाचा. पण सुबोधचंद्राला या धोक्याची कदर नव्हती. या गडगडीच्या आधारानें त्यानें पलीकडे जाण्याचें ठरवलें. ही गडगडी चक्राच्या आकाराची असते. त्या चक्राला खालीं एक वाटोळी सरी (ring) असते. त्या सरीला घट्ट पकडून गडगडीला वेग द्यायचा म्हणजे ती एका पर्वतापासून दुसऱ्या पर्वतापर्यंत बांधलेल्या तारेवरून गडगडत जाते. मध्येंच आपले हात या गडगडीपासून सुटतील म्हणून त्यानें कपड्यानें आपलें शरीर गडगडीच्या चक्राला घट्ट बांधलें व नंतर डोळे मिटून जमिनीच्या आधारानें धक्का दिला व गडगडी चालू केली. झोपाळ्याप्रमाणें नंतर त्या गडगडीला वेग मिळाला व ती दुसऱ्या पर्वताच्या टोकापर्यंत जाऊन पोंहोचली. तेथें पोंचल्यावर आपल्या शरीराला बांधलेला कपडा सोडून गडगडीपासून तो खालीं उतरला, अशा रीतीनें या गडगडीच्या धोक्याच्या प्रवासांतून तो पार

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे ६००९

पडला. नंतर तेथून पूर्वदिशेकडे गेलेल्या मार्गानें चालत जाऊन त्यानें चीन देशांत प्रवेश केला.

# फुंगींचा समागम

चीन देशामध्यें सहासात महिने भटकत असतां इरावती नदीच्या मुखाजवळील पर्वतावर, ज्यांना फुंगी असें म्हणतात असे चिनी साधु राहतात असें कळून आल्यामुळें, त्या साधूंच्या दर्शनार्थ, त्या नदीच्या मुखापर्यंत तो चालत गेला. तेथें पोंचल्यावर त्याला त्या नदीच्या मुखाजवळ अनेक जुनीं धर्ममंदिरें व साधु लोकांचे आश्रम दिसले. यांपैकीं कांहीं मंदिरें २००० वर्षांपूर्वीं बांधलेलीं इतकीं जुनीं आहेत. त्याशिवाय या नदीच्या आसमंतात् असलेल्या पर्वतांवर ठिकठिकाणीं अनेक गुहा, स्तूप व गुंफा असून त्यांत अनेक चिनी साधु परमार्थसाधन करण्यांत गढलेले असतात. या चिनी साधूंना चीन देशांत फुंगी या नांवानें ओळखतात. हे फुंगी बुद्धधर्मानुसार अत्यंत कडक संन्यासधर्म आचरतात. फक्त एका पीतवस्त्राशिवाय दुसरें कांहींहि वस्त्र ते वापरीत नसतात. त्यांचें मस्तक नेहमीं उघडें असतें. त्यांच्याजवळ कमंडलू, भिक्षापात्र व ताडपत्राचा एक पंखा असतो. स्त्रियांपासून अलिप्त राहण्याबद्दलचा यांचा एवढा कडक नियम असतो कीं, ते

स्त्रियांकडून भिक्षासुद्धां घेत नाहींत. ते भिक्षा मागतात
फक्त एकदां सूर्योदयापूर्वी. केवळ शरीरपोषण होईल एवढें
अत्यल्प, साधें अन्न त्यांनीं खावयाचें असतें. तसेंच मध्यान्ह
नंतर त्यांनीं अन्नग्रहण करायचें नसतें. सर्व आयुष्यभ
निष्कांचन राहण्याबद्दलचा दंडक तर त्यांना अत्यंत कसोशी
पाळावा लागतो. त्यामुळें ते जन्मांत कधींहि एखाद्
नाण्यालासुद्धां शिवत नसतात. या फुंगींपैकीं कांहींज
शहरांतील व खेड्यापाड्यांतील बुद्धधर्म-मंदिरांमध्यें राहत
व लोकांना विद्यादान आणि धर्मोपदेश करण्यांत आपलें आयु
घालवतात. ज्यांचा अध्यात्माकडे विशेष ओढा असतो अ
फुंगी मात्र, समाजापासून फार दूर अशा निर्जन ठिकाण
आश्रम बांधून तेथील एकान्तवासांत आपला सर्व काळ ईश्व
चिंतन करण्यांत घालवतात.

परमार्थसाधनांत गढून गेलेल्या अशा कांहीं फुंगींच
सहवास या इरावती नदीच्या कांठच्या पर्वताशीं पोंहोचल्याव
सुबोधचंद्राला सुदैवानें लाभला. त्यांच्यापैकीं कांहींजणांन
अध्यात्मामध्यें एवढी प्रगति करून घेतली होती कीं, त्यांन
महात्मेच म्हटलें पाहिजे. वाघ-सिंहांसारखे क्रूर पशूसुद्ध
आपला हिंस्र स्वभाव टाकून या फुंगींजवळ अगदीं गरिबी
वागत असलेले सुबोधचंद्राला दिसून आलें व तो त्यांची त
दैवी शक्ति पाहून थक्क होऊन गेला. हे फुंगी ज्या विहारांम

किंवा लेण्यांमध्यें राहत तेथें प्रथम प्रथम सुबोधचंद्राला भीती-जनक असे अनेक अनुभव येत. एका विहारामध्यें जावें तर एक कोणी वृद्ध हातांत काठी घेऊन विहाराच्या दाराशींच उभा आहे असें दिसावें. बराच वेळ त्या वृद्धाची आकृति तशी उभी आहे, हालचाल करीत नाहीं, म्हणून जवळ जाऊन निरखून पाहावें, तर हुबेहूब सजीव माणसासारखा दिसेल व माणसाच्याच आकाराचा असा तो केवळ निर्जीव पुतळा आहे, असें मग दिसून यावें. दुसऱ्या एखाद्या विहारामध्यें जिकडे तिकडे यमनगरीचाच देखावा दिसावा. मृत्युलोकांत पापें करून मेल्यानंतर यमाच्या दरबारांत आपल्या पापांचा झाडा देण्यासाठीं गेलेल्यांपैकीं कोणास यमदूत हातांत करवत घेऊन उभा चिरीत आहे, तर दुसऱ्या कोणास उकळणाऱ्या तेलाच्या कढईंत टाकीत आहे, तिसऱ्या-च्या डोक्यावर गदेचे प्रहार होत आहेत, तर कित्येकांस हे यमदूत सुळावर चढवीत आहेत, तर कित्येकांचीं पोटें फाडून गिधाडें त्यांच्या पोटांतील आंतडीं खात आहेत अशा प्रकारचीं भयंकर चित्रें ठिकठिकाणीं उभीं असलेलीं दिसावीं! एखाद्या विहारामध्यें बुद्धाची एखादी अजस्र मूर्ति उभी असावी. तिला वंदन करण्याकरितां तिच्या चरणांना जाऊन स्पर्श केला, तर ती लगेच सबंध मूर्ति जोरानें हालूं लागावी. मग कळून यावें कीं, ती अशाच एका विशिष्ट धातूची केली आहे कीं, तिला

स्त्रियांकडून भिक्षासुद्धां घेत नाहींत. ते भिक्षा मागतात ती फक्त एकदां सूर्योदयापूर्वी. केवळ शरीरपोषण होईल एवढेंच अत्यल्प, साधें अन्न त्यांनीं खावयाचें असतें. तसेंच मध्यान्हा-नंतर त्यांनीं अन्नग्रहण करायचें नसतें. सर्व आयुष्यभर निष्कांचन राहण्याबद्दलचा दंडक तर त्यांना अत्यंत कसोशीनें पाळावा लागतो. त्यामुळें ते जन्मांत कधींहि एखाद्या नाण्यालासुद्धां शिवत नसतात. या फुंगींपैकीं कांहींजण शहरांतील व खेड्यापाड्यांतील बुद्धधर्म-मंदिरांमध्यें राहतात व लोकांना विद्यादान आणि धर्मोपदेश करण्यांत आपलें आयुष्य घालवतात. ज्यांचा अध्यात्माकडे विशेष ओढा असतो असे फुंगी मात्र, समाजापासून फार दूर अशा निर्जन ठिकाणीं आश्रम बांधून तेथील एकान्तवासांत आपला सर्व काळ ईश्वर-चिंतन करण्यांत घालवतात.

परमार्थसाधनांत गढून गेलेल्या अशा कांहीं फुंगींचा सहवास या इरावती नदीच्या कांठच्या पर्वताशीं पोंहोचल्यावर सुबोधचंद्राला सुदैवानें लाभला. त्यांच्यापैकीं कांहींजणांनीं अध्यात्मामध्यें एवढी प्रगति करून घेतली होती कीं, त्यांना महात्मेच म्हटलें पाहिजे. वाघ-सिंहांसारखे क्रूर पशूसुद्धां आपला हिंस्र स्वभाव टाकून या फुंगींजवळ अगदीं गरिबीनें वागत असलेले सुबोधचंद्राला दिसून आलें व तो त्यांची ती दैवी शक्ति पाहून थक्क होऊन गेला. हे फुंगी ज्या विहारांमध्यें

किंवा लेण्यांमध्यें राहत तेथें प्रथम प्रथम सुबोधचंद्राला भीतीजनक असे अनेक अनुभव येत. एका विहारामध्यें जावें तर एक कोणी वृद्ध हातांत काठी घेऊन विहाराच्या दाराशींच उभा आहे असें दिसावें. बराच वेळ त्या वृद्धाची आकृति तशी उभी आहे, हालचाल करीत नाहीं, म्हणून जवळ जाऊन निरखून पाहावें, तर हुबेहूब सजीव माणसासारखा दिसेल व माणसाच्याच आकाराचा असा तो केवळ निर्जीव पुतळा आहे, असें मग दिसून यावें. दुसऱ्या एखाद्या विहारामध्यें जिकडे तिकडे यमनगरीचाच देखावा दिसावा. मृत्युलोकांत पापें करून मेल्यानंतर यमाच्या दरबारांत आपल्या पापांचा झाडा देण्यासाठीं गेलेल्यांपैकीं कोणास यमदूत हातांत करवत घेऊन उभा चिरीत आहे, तर दुसऱ्या कोणास उकळणाऱ्या तेलाच्या कढईत टाकीत आहे, तिसऱ्याच्या डोक्यावर गदेचे प्रहार होत आहेत, तर कित्येकांस हे यमदूत सुळावर चढवीत आहेत, तर कित्येकांचीं पोटें फाडून गिधाडें त्यांच्या पोटांतील आंतडीं खात आहेत अशा प्रकारचीं भयंकर चित्रें ठिकठिकाणीं उभीं असलेलीं दिसावीं! एखाद्या विहारामध्यें बुद्धाची एखादी अजस्र मूर्ति उभी असावी. तिला वंदन करण्याकरितां तिच्या चरणांना जाऊन स्पर्श केला, तर ती लगेच सबंध मूर्ति जोरानें हालूं लागावी. मग कळून यावें कीं, ती अशाच एका विशिष्ट धातूची केली आहे कीं, तिला

हात लागतांच ती कांपूं लागावी ! एखादे रात्रीं एखाद्या स्तूपांत किंवा विहारांत सुबोधचंद्राला एकटेंच झोपण्याचा प्रसंग येई. झोपीं गेल्यावर मध्यरात्रीस आजूबाजूस चित्रविचित्र आकृति धावत आहेत, बोलत आहेत, तऱ्हेतऱ्हेचे आवाज निघत आहेत, असा भास होऊन त्याच्या अंगाला दरदरून घाम यावा व त्याला बाहेर धूम ठोकणें भाग पडावें !

## वडिलांची भेट

अशा प्रकारच्या अनेक चमत्कारिक गोष्टींचा अनुभव घेत सुबोधचंद्र तेथेंच त्या फुंगी महात्म्यांच्या आश्रमांत सहा-सात महिने राहिला व तेथें पहिल्यानें त्यानें प्राणायाम व योगसाधन यांचा अभ्यास सुरू केला. पुढें तो तेथून भमोस आला. भमोपासून ब्रिटिश प्रदेश लागतो. त्यामुळें ब्रिटिश हद्दींत शिरतांच, त्याचा तपास लावण्याकरितां त्याच्या वडिलांनीं ठिकठिकाणीं पूर्वींच तारा पाठवलेल्या असल्यामुळें व त्यास पकडण्याबद्दल वॉरंट काढलें असल्यामुळें त्या वॉरंटानें त्यास तेथें पकडण्यांत आलें व तुमचा मुलगा सापडला आहे अशी त्याच्या वडिलांस तिकडच्या सरकारी अधिकाऱ्यांनीं तार केली. वडील लगेच त्या गांवीं येऊन पोंचले व शुष्क काष्ठासारखें झालेलें तें आपल्या मुलाचें

शरीर व त्याचे फाटलेले कपडे पाहून ते दुःखानें रडूं लागले ! “ बाळ, इतके दिवस तूं मला पत्र कसें लिहिलें नाहींस ? जंगलांत इतके दिवस कसा राहत होतास व काय खात-पीत होतास ? ” वगैरे अनेक प्रकारें मायेनें विचारपूस करूं लागले. नंतर त्यांनीं त्याच्यासाठीं नवे कपडे शिवले. त्याच्या अंगीं पूर्ववत् शक्ति यावी म्हणून, त्याच्या पौष्टिक खाण्यापिण्याची चांगली व्यवस्था केली व हवेसाठीं आपणहि त्याच्याबरोबर दोन महिने त्याच ठिकाणीं राहून नंतर त्याला घेऊन ते परत मंडालेला आले. यानंतर वडिलांनीं त्यास पुनः शाळेंत घातलें. तो शाळेंत जाई व अभ्यासहि नीट करी, पण त्याचें खरें लक्ष जगदंबा देवीच्या भक्तीकडेच असे. त्यामुळें सकाळ-संध्याकाळ देवीची पूजा-प्रार्थना करण्यांत त्याचा सर्व वेळ खर्च होई. या वेळीं सुबोधचंद्र अवघा अकरा वर्षांचा होता.

वडिलांच्या आग्रहामुळें जरी तो घरीं आला होता, तरी त्याचें मन तेथें रमणें शक्य नव्हतें. तो त्यामुळें यापुढें पुनः पुन्हा चारदा घर सोडून गेला व रानावनांत राहून ईश्वरसाधन करूं लागला पण चारहि वेळा त्याच्या वडिलांनीं त्याचा शोध लावून त्याला घरीं आणलें.

पुढें कांहीं दिवसांनीं त्याच्या वडिलांनीं पेन्शन घेतलें व ते पूर्व बंगाल्यांत सर्व कुटुंबासह आपल्या घरीं येऊन राहिले. तेथें गेल्यावर त्याच्या वडिलांनीं, “ तूं घरीं राहूनच तपश्चरण

कर ! तुला येथें गुहा बांधून देतों. घरीं राहूनहि तुला ईश्वरी साक्षात्कार होईल. ईश्वर कोठें दूर नाहीं, तो तुझ्या अंतर्यामींच आहे !–" असा उपदेश करून घरीं राहायला त्याला प्रवृत्त केलें. नंतर घराच्या पूर्व दिशेला एका वटवृक्षाखालीं एक गुहा व गुहेवरती एक पर्णकुटी बांधून व त्या पर्णकुटीभोंवतीं सुंदर वृक्ष व फुलझाडें लावून, त्या ठिकाणीं आपल्या मुलाच्या तपश्चरणाची सोय करून दिली. सुबोधचंद्र या गुहेंत दिवस-रात्र आपला सर्व वेळ ईश्वरचिंतन व योगसाधन करण्यांत घालवूं लागला. पण घर व कुटुंबांतील माणसें जवळ जवळ असल्यामुळें त्याच्या मनाला वाटावी तेवढी स्वतंत्रता वाटेना, आणि त्याच्या मनाचें समाधान होईना. या कारणामुळें शेवटीं पांचव्यांदा त्यानें घर सोडून जाण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें एक दिवस कोणाला न कळवितां तो घरून निघाला व नवद्वीप नांवाचें एक प्रख्यात तीर्थस्थान आहे तें गांठलें. चैतन्यप्रभूचा जन्म ज्या ठिकाणीं झाला तेंच हें पवित्र स्थान होय. तेथील एका मंदिरांत श्रीचैतन्यप्रभूची सोन्याची प्रतिमा आहे. रोज या प्रतिमेचें दर्शन घ्यावें व तेथें चाललेलें संकीर्तन ऐकत बसावें, असा क्रम त्यानें सुरू केला.

या मंदिरांत संकीर्तन ऐकण्यासाठीं गेल्यावर त्या श्रीचैतन्याच्या सोन्याच्या मूर्तीवर त्याची दृष्टि खिळून राही

व त्या थोर ईश्वरभक्ताचें सबंध चरित्र पुनःपुन्हा त्याच्या मनश्चक्षूंपुढें उभें राही !

पंधराव्या शतकांत नवद्वीप हें मोठें विद्यापीठ होतें. गांवोगांवचे लोक गंगातीरावर बसलेल्या या नगरींत विद्यार्जनाकरतां येत. अशाच विद्यार्जन करण्याकरितां तेथें आलेल्या जगन्नाथ मिश्र नांवाच्या एका तरुणाचा या द्वीपांतील एका पंडिताची कन्या शचीदेवी इच्यार्शी विवाह झाला, व त्यानें पुढें या द्वीपांतच आपल्या गृहस्थाश्रमाला आरंभ केला. या दोघांच्या पोटीं जन्माला आलेला विश्वंभर नांवाचा मुलगाच पुढें श्रीचैतन्यदेव म्हणून प्रसिद्धीस आला.

# श्रीचैतन्यदेव

श्रीचैतन्याचा बाप जगन्नाथ मिश्र हा अत्यंत धार्मिक, उदार आणि विद्वान् होता. तशीच शचीदेवीहि अत्यंत सुशील व धर्मपरायण होती. या शचीदेवीचें वर्णन चैतन्य-भागवतांत " मूर्तीमति विष्णुभक्ति सेइ जगन्माता " असें केलेलें आहे. अशा सद्गुणी आई-बापांच्या वळणांत वाढूनहि हा मुलगा बाळपणांत फार व्रात्य व खोडकर निघाला. आपल्या नाना प्रकारच्या हूडपणानें गांवांतल्या सर्व लोकांशीं तंटाभांडण करण्यांत त्याचा सबंध दिवस जाई. पण विश्वंभराच्या या

वृत्तींत आमूलाग्र बदल घडवून आणण्यास एक गोष्ट कारण झाली. विश्वरूप नांवाचा त्याला एक वडील भाऊ होता. त्या वडील भावानें संन्यास घेतला व घराचा त्याग केला. काय असेल तें असो, या गोष्टीमुळें विश्वंभराची मनःस्थिति पार बदलून गेली व यापुढें पूर्वीचा हूडपणा सोडून देऊन तो आपल्या अभ्यासांत अतिशय लक्ष देऊं लागला, व लवकरच निरनिराळ्या पंडितांच्या हाताखालीं शिकून त्यानें एवढें ज्ञान मिळविलें कीं, त्याच्या विद्वत्तेचा लौकिक सर्वत्र पसरला, व त्याजकडे विद्या शिकायला अनेक विद्यार्थी येऊं लागले. थोड्या दिवसांनीं त्याचें लक्ष्मीदेवी नांवाच्या रूपवान् मुलीशीं लग्न झालें व त्यानें संसार करण्यास सुरुवात केली.

प्रेमळ माता, रूपगुणसंपन्न व अनुरक्त पत्नी, भक्तिभावानें सन्मान देणारे शिष्य, विद्वानांच्या सभेंत मान्यता, अशा गोष्टींचा लाभ होऊन त्याचा काळ यापुढें सुखासमाधानांत जाऊं लागला. या पूर्ववयांत ज्ञानाभिमान व कर्मठपणा हे गुण त्याच्या अंगीं मुसमुसलेले होते. पण माधवपुरी नांवाच्या एका साक्षात्कारी वैष्णवाच्या सहवासानें त्याचें मन भक्ति-मार्गाकडे ओढलें गेलें. पुढें माधवपुरीकडून विश्वंभरानें मंत्रदीक्षा घेतली. त्याच्या मनांत जागृत झालेला भक्तिभाव दिवसेंदिवस इतका बळावत गेला, कीं त्याच्या आराध्य-देवतेचें— श्रीकृष्णाचें— त्याला वेडच लागल्यासारखें झालें.

विद्यार्थ्यांना शिकवूं लागला कीं, शिकविण्याचा विषय बाजूला राहून, कृष्णनामावर त्याचें व्याख्यान सुरू होई !

कोणाच्या तोंडून नुसता ' कृष्ण ' हा शब्द निघाला, तरी तेवढ्यानें त्याच्या हृदयांतील भक्तिभाव उचंबळून येऊन डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागत.

थोड्या दिवसांनीं त्यानें आपल्या शिष्यांना सांगितलें, " तुम्ही दुसऱ्या एखाद्या गुरूजवळ जा. ह्याउपर माझ्या हातून अध्यापनाचें काम होणार नाहीं. सगळ्या जगांत मला कृष्णनामाशिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं ! " पण या शिष्यांनीं दुसऱ्या गुरूजवळ शिकायला जाण्याचें नाकारून तेहि त्याच्या भक्तिपंथांत सामील झाले. हळूहळू विश्वंभराच्या-भोंवतीं जमणारा वैष्णवांचा मेळा वाढूं लागला व त्या सर्वांच्या कृष्णभक्तीमुळें त्या नवद्वीपामध्यें एक नवें चैतन्यच निर्माण झाल्यासारखें झालें. त्याच्या शिष्यवर्गामध्यें अद्वैताचार्य, मुकुंददत्तासारखे हिंदु भक्तच होते असें नव्हे, तर बुद्धिमंतासारखे मुसलमान भक्तहि त्याच्या या संघांत आले. विश्वंभराच्या आज्ञेवरून हे त्याचे शिष्य घरोघर जाऊन कृष्णभक्तीचा लोकांना उपदेश करूं लागले. नवद्वीपांत आतां ठिकठिकाणीं हरिनामसंकीर्तनें होऊं लागलीं. निराळ्या पंथांतील हिंदूंनीं व मुसलमान अधिकाऱ्यांनीं प्रथम विश्वंभर व त्याचे हे वैष्णवशिष्य यांना पुष्कळ त्रास दिला. पण

विश्वंभराच्या कृष्णभक्तीचें सामर्थ्य एवढें कीं, त्यानें या विरुद्धपक्षीयांमध्येंच मतांतर घडवून आणलें व त्यांनाच उलट आपला भक्तिपंथ स्वीकारायला लावला.

यानंतर विश्वंभरानें गयेची यात्रा केली. गयेची यात्रा करून आल्यावर संन्यासदीक्षा घेण्याचा विचार त्याच्या मनांत बळावला. तो विचार ऐकतांच त्याची आई शचीदेवी मूर्च्छित होऊन पडली. पण आपल्यावर अशा प्रकारचें अमर्याद प्रेम करणाऱ्या कुटुंबीयांचा मोह त्याच्या या निश्चयाच्या आड आला नाहीं. त्यानें केशवभारती नांवाच्या संन्याशाकडून संन्यासदीक्षा घेतली. या वेळीं चैतन्याचें वय अवघें २४ वर्षांचें होतें. " माझा प्राणनाथ जो कृष्णचंद्र त्याला भेटायला मी अरण्यांत जातों ! " असें म्हणून चैतन्य आतां अरण्यांत जावयाला निघाला. तेव्हां त्याचे शिष्यहि त्याच्या मागोमाग जाऊन त्यांनींहि अरण्यवास पत्करला. यानंतर यानें राहिलेलें आपलें आयुष्य यात्रा करण्यांत, देशोदेशीं लोकांमध्यें धर्मप्रसार करण्यांत व वैष्णव धर्माला शुद्ध व पवित्र वळण लावण्यांत घालविलें.

श्रीचैतन्याचें हें सर्व चरित्र आठवल्यावर आर्त मनानें सुबोधचंद्र ईश्वराचा धावा करी, " देवा त्या श्रीचैतन्यप्रभू-प्रमाणेंच माझ्या मनांत जागृत झालेल्या या भक्तीला योग्य मार्ग दाखव ! माझ्या आयुष्याचें सार्थक होऊं दे ! "

या नवद्वीप क्षेत्रांत मृतांचे अंत्यसंस्कार केल्यानें त्यांच्या आत्म्यांना सद्गति मिळते, अशी लोकांची भावना असल्यामुळें, या स्मशानामध्यें हजारों मृत माणसांच्या डोक्यांच्या कवट्या व इतर हाडें यांचे ढीगच्या ढीग पडलेले आढळून येतात. या ठिकाणीं कोणी साधु प्रेतावर बसून, तर कोणी गळ्यांत कवट्यांची माळ घालून तांत्रिक साधना करण्यांत मग्न झालेले दिसतात. जारण-मारणविद्येंत प्रवीण असलेले दुसरे कांहीं बैरागी त्या विद्येच्या द्वारें अनेक चमत्कार करून दाखवण्याच्या उद्योगांत असतात. याशिवाय निरनिराळ्या मठांमधून व मंदिरांतून असे कांहीं शास्त्री-पंडित या क्षेत्रांत आढळतात कीं, धर्मशास्त्रासंबंधीं व वेदान्तासंबंधीं शब्दांचा कीस काढून अष्टौप्रहर वादविवाद करीत बसण्यांतच आपल्या जन्माचें सार्थक आहे असें त्यास वाटत असतें.

अशा या साधु-संन्यासी, जटी-बैरागी, शास्त्री-पंडित वगैरे निरनिराळ्या प्रकारच्या वर्गांमधून एखाद्या मुमुक्षूला, आपल्याला सन्मार्ग दाखवूं शकणारा आपला गुरु शोधून काढण्यांत यश येणें ही गोष्ट दुरापास्तच म्हणायची ! पण एखाद्या उच्च ध्येयासाठीं मन खरोखरच तळमळूं लागलें म्हणजे ईश्वर त्या ध्येयाकडे नेणारा मार्ग त्या माणसाला दाखविल्याशिवाय राहत नाहीं. सुबोधचंद्रालाहि या क्षेत्रांत असेंच दैवी साहाय्य लाभलें असें म्हटलें पाहिजे. कारण अशा

मुमुक्षूंना अध्यात्माचा मार्ग दाखवायला जो अत्यंत अधिकारी अशा एका खऱ्याखुऱ्या संताचा सुबोधचंद्राला समागम घडून त्या संताचा त्याजवर अनुग्रह झाला. तेव्हांपासून तो भगवी वस्त्रें धारण करूं लागला. अशा रीतीनें एवढ्या काळांत अनेक प्रकारें देह कष्टवून मिळविलेल्या दिव्य अनुभवामुळें यापुढें त्याचें मन पूर्णपणें वैराग्ययुक्त बनलें व सर्व संसार आतां त्याला प्रभुमय वाटूं लागला. कांहीं दिवसांनीं नवद्वीप सोडून सुबोधचंद्र वर्धमान नगरीला चालत गेला. तेथून तो काशीला जावयास निघाला. प्रयागच्या या प्रवासांत त्याचे फार हाल झाले. संतांनीं भिक्षा मागावी असें शास्त्रांत सांगितलें आहे, पण सुबोधचंद्राचा मूळापासून स्वभावच असा कीं, भिक्षा म्हणून मागायची नाहीं. शेवटपर्यंत त्याचा तो स्वभाव तसाच राहिला. कोणी आपण होऊन कांहीं खायला आणून दिलें तरच तो खात असे. त्यामुळें पुष्कळदा त्यास दिवसां-मागून दिवस उपास घडे. असे उपास घडल्यामुळें व कांट्याकुट्यांतून अनवाणी चालून पायांचे तळवे सुजल्यामुळें व त्यांतून रक्त येऊं लागल्यामुळें त्याचप्रमाणें उन्हा-पावसापासून स्वतःच्या शरीराचें रक्षण करण्यास कोणतेंहि साधन नसल्यामुळें काशीस पोंहोचेतों त्याच्या देहाला फारच कष्ट पडले. पण ईश्वरप्राप्तीचें एकदां वेड लागलें म्हणजे भक्ताला या अशा हालअपेष्टांची क्षिती नसते. " देह जावो अथवा राहो ! "

असाच त्याचा निर्धार झालेला असतो. अशा निर्धारामुळेंच, भक्तजनाला आत्मबलाची प्राप्ति करून घेऊन त्या बलाच्या योगें मोक्षसोपान चढून जाण्यांत यश मिळतें. काशीला पोंहोचल्यावर सुबोधचंद्रानें पांच-सहा महिने निरनिराळ्या साधुसंतांच्या सहवासांत राहून अध्यात्मज्ञान मिळवलें व नंतर तो प्रयाग-तीर्थाला गेला. अलाहाबादला गंगेच्या पैलथडीला झोषी नांवाची एक तपोभूमि आहे. त्या तपोभूमीच्या आसपास उंच उंच गिरिशिखरें दिसतात. त्या गिरिशिखरांमध्यें मोठ-मोठ्या गुहा आहेत. एका गिरिशिखराजवळ एक मोठी विहीर आहे. तिचें पाणी समुद्रपाण्याप्रमाणें खारट असल्या-मुळें त्याला समुद्रकूप म्हणतात. या ठिकाणाहून गंगायमुनेच्या संगमाचें दृश्य फारच सुंदर दिसतें. अशा या निसर्गसुंदर व निवान्त स्थानीं निरनिराळ्या गुंफांमधून अनेक तपस्वी ध्यानधारणा करीत बसलेले असतात. सुबोधचंद्रानें अध्यात्म-चिंतनासाठीं हेंच स्थळ पसंत केलें.

## देवी-दर्शन

समुद्रकूपाजवळ असलेल्या एका वटवृक्षाखालील गुहेमध्यें त्यानें वास्तव्य करायला सुरुवात केली. या गुहेमध्यें आपल्या आराध्यदेवतेच्या—श्रीसरस्वतीच्या— मूर्तीची स्थापना करून भजनपूजन, चिंतन, कीर्तन इत्यादि प्रकारें एकनिष्ठेनें तिची

भक्ति करण्यांत तो आतां आपला सर्व काळ घालवूं लागला. हळूहळू आपल्याला पराकाष्ठेची शांति व समाधान प्राप्त होत आहे अशी अनुभूति त्याला होऊं लागली. त्याचप्रमाणें देवीचें ध्यान करूं लागतांच देवीच्या मूर्तीभोंवतीं एक तेजोवलय त्याला दृश्यमान् होऊं लागलें. एक दिवस तर सुबोधचंद्राच्या आयुष्यांतला एक अत्यंत भाग्याचा असा प्रसंग घडून आला. त्या दिवशीं नित्य नेमाप्रमाणें तो श्रीसरस्वतीचें ध्यान करीत बसला असतां, शुभ्रवस्त्र नेसलेली एक पंधरा-सोळा वर्षांची तेजःपुंज बालिका त्याच्या गुहेच्या तोंडाशीं येऊन उभी राहिली व त्याला उद्देशून म्हणाली, " मी आंत येऊं काय ?" यानें " हो ! " असें उत्तर देतांच झपझप पावलें टाकीत ती थेट सरस्वतीच्या मूर्तीला जाऊन भिडली. नंतर एक-दोन मिनिटांनीं ती परत फिरली व गुहेच्या बाहेर जाऊं लागली. एक कोणती तरी अदृश्य शक्ति आपल्याला तिच्यामागें ओढून नेत आहे असें सुबोधचंद्रास वाटूं लागलें व तोहि तिच्या मागोमाग जणूं मंत्रमुग्ध स्थितींत असल्याप्रमाणें जाऊं लागला. पण गुहेच्या बाहेर पडतांच ती अदृश्य झाली. हें पाहून सुबोधचंद्र आश्चर्यचकित होऊन विचार करूं लागला कीं, ज्या ठिकाणीं कोणीहि स्त्री आजवर आलेली नाहीं, व येणें शक्य नाहीं, त्या ठिकाणीं ही मुलगी आज कशी आली ? आल्यावर अशा रीतीनें अदृश्य कशी झाली ? प्रत्यक्ष देवीच

तर या मुलीच्या स्वरूपांत मला दर्शन द्यायला आली नव्हती ना? सबंध दिवसभर याच विचाराची तळमळ त्याच्या मनाला लागली होती. त्या रात्रीं झोपीं गेल्यावर त्याच्या प्रश्नाचें उत्तर त्याला मिळालें. त्याला एक स्वप्न पडलें व त्या स्वप्नांत येऊन श्रीसरस्वतीदेवीच त्याला म्हणाली, "आज तुझ्या इष्ट देवतेचें तुला दर्शन झालें. आज दुपारीं तुझ्या गुहेमध्यें आलेल्या मुलीच्या रूपानें मीच तुला दर्शन द्यायला आलें होतें!" लगेच सुबोधचंद्र त्या स्वप्नांतून जागा झाला व त्याचें हृदय आनंदानें भरून आलें. पण त्याच वेळीं दुसरी एक हुरहुर त्याला एकसारखी लागून राहिली. ती ही कीं, प्रत्यक्ष माझी इष्ट देवता माझ्यासमोर येऊन उभी राहिली असतां तिचे चरण कवटाळण्याची बुद्धि मला कशी झाली नाहीं!

## संन्यास

त्रिवेणी संगमावर त्या वेळीं सच्चिदानंद परमहंस नांवाचे एक योगी राहत असत. ते नेहमीं ध्यानसमाधींत मग्न असत. त्यांचा सुबोधचंद्रावर अनुग्रह होऊन त्यांनीं त्यास संन्यास दिला व त्याचें नांव श्रीरामानंदस्वामी असें ठेवलें. या वट-वृक्षाखालील गुहेमध्यें रामानंदस्वामी राहिले असतां त्यांचा लौकिक साऱ्या अलाहाबाद शहरांत पसरला व पुष्कळ लोक त्यांचे भक्त होऊन त्यांचा उपदेश ऐकण्यास येऊं लागले व

त्यांना मोठ्या श्रद्धेनें खाण्यापिण्याच्या वस्तु आणून देऊं लागले. ते राहत होते ती गुहा पहाडाच्या उतरणीवर होती व तेथें जाणाऱ्या माणसाचा एखादे वेळीं पाय घसरला, तर तो खालीं वाहत असलेल्या पाण्याच्या ओघांत पडत असे. असे अपघात होऊं नयेत म्हणून, लोक दर्शनाला आले कीं, त्या कडयावरून उतरून खालील ठिकाणीं ते येऊन बसत व दर्शन दिल्यानंतर परत आपल्या गुहेंत जाऊन बसत. या वेळीं त्यांचें वय अवघें १४ वर्षांचें होतें.

## निसर्गशोभा

नंतर कांहीं दिवसांनीं रामानंदस्वामींना कैलास पर्वतावर जाण्याची इच्छा झाली; व म्हणून अलाहाबाद सोडून हिमालयाच्या दिशेनें ते प्रवास करीत निघाले व द्रोणागिरी पर्वताला जाऊन पोंहोचले. द्रोणागिरी पर्वत समुद्रसपाटीपासून ८००० फूट उंच आहे व त्याची चढण सात मैल आहे. या पर्वतावर देवीचें एक सुंदर मंदिर आहे. मंदिराच्या चारी बाजूंस रात्रीच नव्हे, तर दिवसासुद्धां वाघ, सिंह यांसारख्या हिंस्र पशूंच्या आरोळ्या ऐकूं येतात. असें सांगतात कीं, सिंह हें देवीचें वाहन असल्यामुळें या देवीच्या मंदिराजवळ सिंह दिवसांतून एकदां येऊन जातो. द्रोणागिरी पर्वताच्या या

पहाडावरून हिमालयाचें सुंदर दृश्य दिसतें. समोर लांब-रुंद पसरलेली पंधरा-वीस हिमशिखरांची ती रांग दर घटकेला बदलणारीं, किती विविध व नयनमनोहर चित्रें पाहणाराच्या डोळ्यांपुढें उभीं करीत होती! सूर्योदयापूर्वी थोडा वेळ, अस्तंगत चंद्राच्या पांढरट तेजानें नटलेल्या पश्चिमेकडील पर्वतराशी पूर्वेकडील बर्फाच्या चकचकणाऱ्या पहाडाशीं जणूं कांहीं सौंदर्यांत स्पर्धा करीत आहेत असा भास होई! त्यानंतर उगवत्या सूर्याचे पहिले कोवळे तांबुस-पिवळसर किरण अत्युच्च हिमशिखरावर पडून तें शिखर अरुणवर्णाचें दिसूं लागल्यावर तर, इतर शिखरांमागून शिखरें इतक्या त्वरेनें तो अरुणवर्ण अधिकाधिक मनोहर रीतीनें धारण करूं लागत कीं, जणूं काय निसर्ग त्या गिरिराजरूपी सुवर्णाच्या मेरूला अग्निरसांत बुचकळून काढीत आहे असाच कोणालाहि भास झाला असता. कांहीं वेळ गेल्यावर पुढें असलेल्या बर्फ-शिखरांच्यामागें हिरव्या झाडीनें आच्छादलेली दुसरी एक शिखरांची रांग दृश्यमान् होऊं लागे व सूर्यकिरणांमध्यें तांबुस-पिवळ्या तेजाच्या राशीमध्यें नाहत असल्यासारखीं दिसणारीं हीं बर्फशिखरें व त्यांच्यामागील उंचच उंच देवदारु वृक्षांनीं झाकलेलीं पर्वतशिखरें यांमध्यें जणूं काय अधिक सुंदर कोण याबद्दल अहमहमिकाच चालली आहे असें वाटूं लागे. अशा तऱ्हेनें दिवसभर सौंदर्याचे निरानिराळे नमुने

दाखवीत दाखवीत शेवटीं ही पर्वतमाला सायंकाळची काळी चंद्रकळा परिधान करून आकाशपुष्पांनीं व चंद्रिकेनें आपला साजशृंगार करूं लागली म्हणजे तर, त्या सौंदर्यानें डोळ्यांचें पारणें फिटल्यासारखें वाटे.

या सर्व निसर्गसौंदर्यामध्यें रामानंदस्वामींना प्रत्यक्ष परमात्म्याचें दर्शन लाभल्याचाच भास होई व सच्चिदानंद-स्वरूपीं चित्त स्थिर करून ते तासचे तास ध्यानमग्न होऊन जात.

## नारायणस्वामींची भेट

येथें कांहीं दिवस घालविल्यावर स्वामीजींचे एक गुरुबंधु नारायणस्वामी हे तेथें येऊन पोंहोचले. ते भेटतांच स्वामीजीं-नीं त्यांना विचारलें, "तुम्ही माझ्याबरोबर कैलासला याल काय?" नारायणस्वामींनीं तत्काळ आनंदानें होकार दिला. नंतर दोघेहिजण चालत चालत बागेश्वर गांवापर्यंत येऊन पोंचले. दोघांजवळहि पैसे तर नव्हतेच, शिवाय थंडी, पाऊस यांचें निवारण करण्यास जरूर असलेलीं वस्त्रें, बिछाना व खाण्यापिण्याच्या वस्तुहि नव्हत्या. त्यामुळें या प्रवासांत दोघांना फारच कष्ट पडूं लागले. एखाद्या ठिकाणीं लोकांची वस्ती असली तर नारायणस्वामी भिक्षा मागून आणीत व त्यानें स्वतःची व स्वामीजींची भूक शमन करीत. पण स्वामीजी कितीहि उपासमार झाली तरी भिक्षा मागत नसत. एकदां



श्रीमत् नारायणस्वामी व श्रीमत् स्वामी रामानंद

नारायणस्वामी त्यांना म्हणाले, 'चला, तुम्हीहि आज माझ्या-बरोबर भिक्षा मागा. तसें करायला लाजूं नका. भिक्षा मागणें हें संन्यासधर्माला धरून आहे.' त्यांच्या आग्रहामुळें त्या दिवशीं त्यांच्याबरोबर रामानंदस्वामीहि भिक्षा मागण्याकरितां म्हणून गांवांत गेले; पण लोकांच्या दारांत जाऊन उभे राहिल्यावर इतर संन्याशांप्रमाणें "भिक्षांदेहि" हे शब्दच त्यांच्या तोंडून निघेनात. त्यामुळें भिक्षा न घेतांच ते परत धर्मशाळेंत आले. नारायणस्वामी मात्र भिक्षा मिळवून परत आले होते. त्यांनीं स्वामीजींस हसून पुन्हा उपदेश केला कीं, भिक्षा मागितल्याशिवाय कशी मिळेल ? भिक्षा मिळाली नाहीं तर, या जंगली वस्तींत आपण जगणार कसे ? जगांतले लोक, हे आपल्याला मातापित्याप्रमाणें आहेत. त्यांच्याजवळ भिक्षा मागण्याला शरमण्याचें कारण नाहीं. बागेश्वरहून हे दोघेहि पुढें खक्खोटला गेले. येथें लहान लहान दुकानें आहेत. सर्व प्रवासी पुढील प्रवासासाठीं खाण्यापिण्याचें सर्व सामान येथें विकत घेतात. कारण पुढील डोंगरी भागांत खाण्यापिण्याच्या वस्तूच कोठेंहि मिळत नाहींत. पण इतर यात्रेकरूंप्रमाणें यांच्याकडे त्या सर्व जरूरीच्या वस्तु खरेदी करण्याला पैसे मुळींच नव्हते म्हणून, बरोबर त्या वस्तूंचा सांठा घेतल्या-शिवायच पर्वताची चढण ते चढूं लागले. रस्त्यांत पर्वताची उंच उंच शिखरें लागत होतीं. त्या निमुळत्या कडयांचा

रस्ता चढून जातां जातां दोघांच्याहि शरीरांत त्राण राहिला नाहीं. शिवाय जवळ खायला कांहीं नाहीं अशी स्थिति ! जसजसे हे वर चढूं लागले तसतसा थंडीचा कडाका यांना इतका अधिकाधिक त्रासदायक होऊं लागला कीं, अंगाला हजारों सुया टोंचत असल्याप्रमाणें त्यांना वाटूं लागलें. अशा तऱ्हेचे हाल काढतां काढतां शेवटीं ते बिलजू नांवाच्या एका गांवाला येऊन पोंहोचले. या गांवाजवळ पर्वताची उंची तेरा हजार फूट आहे. या पर्वताच्या चारी बाजूंस पांढरेंशुभ्र बर्फ सांचलें होतें व तें सूर्यप्रकाशांत हिऱ्याप्रमाणें चकाकत होतें. या पर्वताच्या जरा पुढें नंदादेवीचा पर्वत आहे. या ठिकाणीं त्रिलोकसिंग नांवाचे एक सज्जन यांना भेटले. त्यांनीं या दोघांचा चांगला सत्कार केला व आपल्या घरीं यांना राहवून घेतलें. या गांवीं एक दिवस विश्रांति घेतल्यावर हे मिलमला गेले. यापुढें मग कोणताहि गांव लागत नाहीं, कारण यापुढील सर्व प्रदेश बर्फमय झालेला असतो. यापुढील प्रवास करायचा झाला तर तो भूतानी लोकांच्या मदतीनें करावा लागतो. कारण भूतान संस्थानांतील हे (जव्हारी) लोक व्यापारासाठीं तिबेटांत या रस्त्यानें नेहमीं जात-येत असतात, त्यामुळें त्यांना या प्रदेशाची चांगली माहिती असते. कपडा, भांडीं व इकडच्या वस्तू घेऊन ते तिबेटांत जातात व त्या तेथें विकून तिकडच्या चामडें, लोकर, कस्तुरी, शिलाजीत

अशा वस्तु खरेदी करून त्या घेऊन आपल्या देशांत परत येतात.

## हिमालयामध्यें

या मिलम गांवाच्या पुढें प्रवास करणें फार धोक्याचें असतें. कारण बर्फवृष्टि त्या बाजूला अतोनात होते. बर्फाच्या वादळांत सापडून केव्हां कोणता प्रवासी दगावेल याचा नेम नसतो. शिवाय येथील हवा व पाणी हीं जहरीं असतात. पण या गोष्टींची पर्वा न करतां रामानंदस्वामी व नारायण-स्वामी पर्वताची चढण चढूं लागले. शेवटीं ते समुद्रसपाटी-पासून १४००० फूट उंचीवर आले. या प्रवासांत त्यांच्या सर्वांगावर बर्फाचा वर्षाव होतच होता. हें बर्फ अंगावर पडतें, त्या वेळीं कळत नाहीं, पण डोक्यावर दोन-तीन अंगुळें त्याचा थर सांचला म्हणजे, डोक्यावर वजन ठेवल्याचा भास होतो व बर्फाची जाणीव होते. बर्फ पडतो तेव्हां प्रथम नरम व भुसभुशीत असतो, पण नंतर कडक होत जातो व त्याचा त्रास होऊं लागतो. अशा रीतीनें अंगावर पडणारें बर्फ एकसारखें झाडीत ते पर्वतावरील रस्ता तोडीत चालत होते. पण शेवटीं शेवटीं त्यांचीं शरीरें थंडीनें आंखडून काळींठिक्कर पडलीं तेव्हां ते बरेच घाबरले. तरी पण ईश्वराचा नामोच्चार करीत व कैलास-दर्शन घ्यावयाचेंच अशा निर्धारानें ते पुढें

पुढें जाऊं लागले. या प्रवासांत तिबेटांत जाणारे जव्हारी लोक मात्र त्यांस भेटत व त्यांची थोडीबहुत मदत होई. हे भूतानी लोक तिबेटांत जायला निघतात तेव्हां त्यांजबरोबर हजार दोन हजार बकऱ्यांचे कळप असतात. या कळपाची राखण करण्यासाठीं त्यांच्या मागें-पुढें तीन-चार माणसें व मोठमोठे कुत्रे असतात. या कळपामधल्या आघाडीच्या सर्वांत पुढच्या बकरीच्या गळ्यांत एक घांट बांधतात व मग त्या घांटेच्या आवाजाच्या अनुरोधानें इतर सर्व बकऱ्या जातात. या बकऱ्यांच्या अंगावरचे केस दीड दोन फूट लांब असतात, त्यामुळें त्यांना अशा बर्फमय प्रदेशांत टिकाव धरतां येतो. या कळपांना घेऊन भूतानी लोक ज्या प्रदेशांतून तिबेटचा प्रवास करतात, तो प्रदेश समुद्रसपाटीपासून १९००० फूट उंच आहे. या प्रवासांत हे जव्हारी लोक बरोबर तंबू बाळगतात व बकऱ्यांच्या पाठीवरचें सामान उतरवून ठेवतात. नंतर या बकऱ्या वीस-वीस, पंचवीस-पंचवीस जणांचे लहान लहान कळप करून व सर्वांचीं तोंडें एकाच बाजूला करून वाटोळ्या बसतात. नंतर त्यांचें सबंध अंग एकसारख्या पडणाऱ्या बर्फानें झांकून जातें. मात्र त्या सर्वांचीं तोंडें एकत्र झालेलीं असल्यामुळें तेथें त्या सर्वांच्या गरम श्वासानें बर्फाचे आंत भोक पडतें व त्या भोकामुळें त्यांना श्वासोच्छ्वास करायला हवा मिळते. बर्फाची वृष्टि थांबली म्हणजे त्या कळपाचा



**कैलास शिखर**

समुद्रसपाटीपासून उंची २५०२८ फूट

मालक येऊन त्यांच्या अंगावर सांचलेला ४।५ फूट उंचीचा बर्फाचा ढीग बाजूला झाडून त्यांना त्या बर्फांतून बाहेर काढतो. जव्हारी लोकांनासुद्धां अशा रीतीनें बकऱ्यांच्या कळपांचा व तंबूंचा उपयोग करून तिबेटचा हा प्रवास करावा लागतो. मग जवळ धड चिरगुट-पांघरूण नाहीं, खाण्यापिण्याच्या वस्तु नाहींत, पैसे नाहींत व अशा प्रदेशांतून प्रवास करण्याची संवय किंवा माहिती नाहीं, अशा परिस्थितींतील या दोघा संन्याशांच्या या तिबेटच्या प्रवासांत किती हाल-अपेष्टा झाल्या असतील, कसे ज़िवावरचे प्रसंग त्यांजवर आले असतील, याची कल्पनाच केलेली बरी ! पण या जगांतील पुष्कळ मोठमोठीं कामें मानवांकडून ईश्वरावरील निष्ठेच्या व मनोबलाच्या जोरावर पार पडतात. त्या नियमा-प्रमाणें रामानंदस्वामी व नारायणस्वामी हेहि या प्रवासांतून पार पडले.

## कैलास

उटाधारा, जयंति व कोगंडीबिगंडी हीं जीं हिमालयाचीं तीन शिखरें तीं ओलांडून तिबेटांत प्रवेश करावा लागतो. तीं मागें टाकून ते तिबेटांत येऊन पोंहोचले. तेथून असा बराच कष्टमय प्रवास करून ते समुद्रसपाटीपासून २५००० फूट

उंच असलेल्या कैलास पर्वताला जाऊन पोंचले. कैलास पर्वताचें दर्शन होतांच आतांपर्यंत सोसलेल्या सर्व हाल-अपेष्टांचें व जिवावर उदार होऊन केलेल्या साहसाचें चीज झालें असें वाटून त्यांचीं हृदयें हर्षातिशयानें भरून आलीं.

या कैलास पर्वतावर एका प्रभावी महान् पुरुषाचें दर्शन होण्याचा त्यांना योग आला. एक दिवस या पर्वतावर फिरत असतां ते दोघेहि एका गुंफेजवळ येऊन पोंहोचले व त्यांचें लक्ष त्या गुहेंत समाधिस्थ स्थितींत बसलेल्या एका महात्म्याकडे गेलें. त्याच्या तेजस्वी तोंडासभोंवतीं एक तेजोवलय झळकत होतें. त्या महात्म्याच्या अंगावर वस्त्र मुळींच नव्हतें. त्याच्या डोक्यावर शुभ्र जटाभार शोभत होता. त्या महात्म्या-कडे एकदां दृष्टि गेल्यावर त्या दोघांचेहि पाय तेथून हालेनात तेव्हां ते दोघेहि त्या गुहेसमोरच हात जोडून बसून राहिले. तो महात्मा समाधींतून उठला तेव्हां तो यांना म्हणाला, "तुम्ही इकडे कां आलांत? तुमचें इकडे काय काम आहे? येथून जा! इकडे तुमच्यासारख्या लोकांची मुळींच जरूर नाहीं!" पण या दोघांनीं त्या महात्म्याच्या पायांवर डोकें ठेवलें व तेथून हे हालेनात. शेवटीं त्या महात्म्यानें यांना खूप भीतीहि घालून पाहिली. पण त्याचाहि त्यांच्यावर कांहीं परिणाम होईना! अशा रीतीनें पांच-सहा दिवस रामानंदस्वामी व नारायणस्वामी खाण्यापिण्याशिवाय त्या

गुहेच्या समोरच बसून राहिले. या गुहेच्या चारहि बाजूंना बर्फच बर्फ सांचलें होतें व त्यामुळें तेथें बसून राहणें अतिशय त्रासाचें होतें. यांचे हाल होत आहेत हें पाहून, त्या महात्म्यानें यांना तेथून जाण्याबद्दल पुनःपुन्हा निक्षून सांगावें, पण यांनीं तेथून न हालतां आपल्यावर अनुग्रह करण्याबद्दल त्याची प्रार्थना करावी असें रोज चाललें होतें. कांहीं दिवसांनीं नारायणस्वामी तेथून गेले, पण रामानंदस्वामी हट्टानें तेथेंच बसून राहिले. तेव्हां शेवटीं रामानंदस्वामींची परीक्षा पाहण्यासाठीं "मी नको म्हणेपर्यंत बर्फावर असाच बसून रहा!" असें त्या महात्म्यानें सांगितलें व त्याप्रमाणें रामानंदस्वामी अन्नपाण्याशिवाय पंधरा-वीस दिवस एकसारखे तेथें बसून राहिले. शेवटीं शरिरांत कांहीं त्राण न राहिल्यामुळें व शरिरांतलें रक्त थंडीनें गोठून गेल्यामुळें रामानंदस्वामींना मूर्च्छा आली. रामानंदस्वामींचा एवढा निर्धार पाहिल्यावर शेवटीं त्या महात्म्यानें त्यांना उचललें व आंत आपल्या गुंफेंत नेलें. नंतर रामानंदस्वामी शुद्धीवर आल्यावर त्यांना त्या महात्म्यानें आशीर्वाद व उपदेश दिला. अशा रीतीनें इतक्या दुरून अनेक अडचणींना तोंड देऊन व शरीरकष्ट भोगून रामानंदस्वामी कैलासला आले त्याचें सार्थक झालें! काय चमत्कार पहा! अलाहाबादला वास्तव्य करीत असतां एकाएकीं कैलासयात्रा करण्याचा प्रबळ विचार त्यांचे मनांत

कसा उगम पावला व त्याचें कारण काय, याचें उत्तर त्या वेळीं त्यांचें त्यांनाच देतां आलें नसतें! त्यानंतर प्राणांची पर्वा न करतां, उपासमार सहन करीत शारीरिक कष्ट करण्याची पूर्वी संवय नसतांहि, शेंकडों मैल पर्वतचढणीचा प्रवास करण्याचें मानसिक सामर्थ्य त्यांना कसें प्राप्त झालें, हेंहि आश्चर्यच आहे! बरें, कैलासदर्शन अमुक हेतूनें करावें, तेथें गेल्यानें आपला अमुक फायदा होईल, अशी अंधुक कल्पनाहि त्यांच्या मनांत कधीं आली नव्हती! पण असें असलें तरी, एक कुठली तरी अदृश्य शक्ति कैलासकडे जाण्या-बद्दल आपल्याला प्रेरणा करीत आहे, "जीव जावो अथवा राहो," कैलास हा गाठलाच पाहिजे अशी भावना आपल्या मनांत निर्माण करीत आहे, त्यासाठीं कितीहि कष्ट-सायास पडले तरी ते सहन करण्याचें बळ आपल्यामध्यें संचार करीत आहे, "कैलासवर जाण्यांतच तुझें महान् कल्याण साधणार आहे!" असा संदेश दर घटकेला आपल्या कानांत गुणगुणून आपल्याला धीर देत आहे, असें मात्र कैलासच्या या खडतर प्रवासांत त्यांना एकसारखें वाटत होतें! "सतां मनःप्रवृत्तयः प्रमाणाः" या वचनाप्रमाणें ती त्यांची भावना खोटी नव्हती, तर अचूक मार्गदर्शी होती! जणूं परमार्थप्राप्तीच्या त्यांच्या तळमळीमुळें प्रत्यक्ष ईश्वरालाच त्यांची करुणा येऊन त्यानेंच ही प्रेरणा त्यांच्या मनांत निर्माण केली होती! कारण या



जगज्जननी दुर्गा

शुभ्रवर्ण हंसपक्ष्यांचे थवे उडूं लागले म्हणजे जणूं पाहणाऱ्यांच्या डोळ्यांचें पारणें फेडणारें असें एक अत्यंत मधुर निसर्गदृश्य तेथें निर्माण होतें. ज्याच्यामध्यें निसर्गसौंदर्याची परिसीमा झाली आहे, अशा या दृश्यावर रामानंदस्वामींची दृष्टि जातांच चित्सौंदर्यानें नटलेला प्रत्यक्ष परमेश्वरच या निसर्गदृश्याच्या रूपानें आपल्याला दर्शन देत आहे, अशी उदात्त भावना स्वामीजींच्या मनांत उचंबळून येऊन ते अष्टौप्रहर ईश्वरचिंतनांत तल्लीन होऊन जात. अशा रीतीनें या सरोवराच्या तीरावरील गुसल गुंफेंत राहून सतत तीन वर्षें निष्ठेनें तपश्चर्या केल्यावर एक दिवस त्यांचें जन्मोजन्मींचें पूर्वसंचित फळाला आलें; व त्यांना देवीचा साक्षात्कार होऊन ज्या देवीच्या दर्शनासाठीं त्यांनीं आजवर एवढे सायास-तापास काढले, त्या देवीचें अंतीं त्यांना दर्शन झालें ! ज्या सुखाहून या जगांत दुसरी कोणतीहि गोष्ट श्रेष्ठ नाहीं तें ईश्वरदर्शनाचें महत्सुख एवढ्या अल्प वयांत ज्या व्यक्तीला प्राप्त झालें त्या व्यक्तीचें भाग्य केवढें मोठें असलें पाहिजे !

## तपोवन

या तीन वर्षांच्या अवधीनंतर रामानंदस्वामी मानससरोवर सोडून निघाले व टकलाकोट, गर्भ्यांग वगैरे ठिकाणीं जाऊन



श्रीरमादेवी

ब्यास चौदासला आले. या ब्यास चौदासपासून २५ मैल दूर धारचूला नांवाचें गांव आहे, तेथें रुमादेवी नांवाच्या संन्यासिनीचा तपोवन-आश्रम आहे. या रुमादेवींना त्यांच्या पूर्ववयांत श्रीरामकृष्ण परमहंस यांचें शिष्यत्व लाभलें. प्रख्यात स्वामी विवेकानंद हे रुमादेवींचे गुरुबंधु होत. श्रीरामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद यांसारख्या महात्म्यांचें सान्निध्य व त्यांजकडून अध्यात्मशिक्षण लाभलेल्या या रुमादेवींनीं आपलें सर्व आयुष्य आत्मसाधनाला वाहावें व त्यांत फार मोठी प्रगति करून घ्यावी यांत नवल नाहीं. श्रीरामकृष्ण परमहंस यांचा यांजवर अनुग्रह होऊन त्यांनीं यांना संन्यासदीक्षा दिल्यापासून सतत तीन तपें हिमालयांत राहून या रुमादेवींनीं तपश्चर्या केली आहे. अध्यात्मचिंतन व आपल्या तपोवन-आश्रमांत येणाऱ्या-जाणाऱ्या साधुसंतांची सेवा करणें या गोष्टींमध्यें त्या आपला काळ घालवीत असतात.

रुमादेवींच्या या तपोवन-आश्रमामध्यें येऊन रामानंदस्वामी कांहीं दिवस राहिले. येथेंच नारायणस्वामीहि येऊन त्यांना भेटले. येथें कांहीं काळ ते राहिले असतां, तेथें भूतानचे एक मोठे लक्षाधीश पटवारी, खुशालसिंग, हे त्यांचे भक्त झाले. या गृहस्थांनीं रामानंदस्वामींना असा आग्रह सुरू केला कीं, ब्यास चौदासलाच आश्रम बांधून त्यांनीं राहावें व जेथून हिमालयाचें फारच सुंदर दृश्य दिसतें, अशी एक समुद्र-

सपाटीपासून ११००० फूट उंच जागा आहे, ती जागा त्यांनीं दाखवून, तेथें प्रथम त्यांच्यासाठीं गवताची झोपडी बांधून दिली व पुढें दोन-तीन वर्षांनीं तेथेंच आश्रमासाठीं दगडाची सुंदर इमारत बांधून दिली.

व्यास चौदास हें एक अत्यंत रम्य व प्रशान्त असें स्थान असून, येथें पूर्वी व्यास ऋषींनीं तपश्चर्या केली असल्यामुळें त्यावरून या स्थानास हें नांव पडलें आहे, व त्यामुळेंच हें स्थान लोकांकडून फार पवित्र मानलें जातें.

## भूतानी भेदू


पण एखादें स्थान कितीहि पवित्र असलें, तेथें कितीहि श्रेष्ठ साधुसंतांचा वास असला, तरी तेथें एखादे वेळेस कोणी तरी एखादा दुर्जन जाऊन त्या स्थानाचें पवित्र वातावरण आपल्या दुष्ट आचरणानें दूषित करणार नाहीं असें थोडेंच आहे! या व्यास चौदास संस्थानाला भूतानमधील अशाच भेदू नांवाच्या एका चमत्कारिक दुष्ट माणसाचा फार उपसर्ग बाधूं लागला होता. या इसमाची दृष्टीच एवढी दुष्ट होती कीं, ती ज्याच्यावर जाईल त्यास हटकून कांहीं तरी व्याधि होई व तो तडफडून मरण पावे! अशा प्रकारें बिचाऱ्या अनेक निर्दोष माणसांची या भेदूकडून तेथें हत्या घडली होती. ज्या वेळीं

क्र. ६०९७

स्वामीजींसाठीं येथें इमारत बांधली जात होती, त्या वेळीं या दुष्ट माणसाकडून स्वामीजींनासुद्धां फार त्रास बाधला. स्वामीजींचा नाश करण्यासाठीं त्यानें अनेक प्रयत्न केले, परंतु स्वामीजींच्या देवीच्या कृपेमुळें ते सर्व निष्फळ झाले. शेवटीं या दुष्ट माणसामुळें बाधणाऱ्या दुःखांतून लोकांना मुक्त करण्याच्या हेतूनें स्वामीजींनीं आपल्या आत्मिक सामर्थ्याच्या द्वारें या माणसाच्या दुष्ट बुद्धीमध्यें उपरति घडवून आणली व शेवटीं तो स्वामीजींना शरण आला. तेव्हांपासून त्याची हिंसक दृष्टि जाऊन तो लोकांशीं फार चांगल्या रीतीनें वागूं लागला. या ठिकाणीं तीन वर्षें राहण्याची प्रतिज्ञा करून स्वामीजींनीं येथें वास्तव्य करायला व आपल्या समाधीच्या अभ्यासाला सुरुवात केली.

अशा रीतीनें अडीच वर्षांचा अवधि गेल्यावर एकदां अकस्मात् सहासात दिवस इतकी जोराची बर्फवृष्टि झाली कीं, त्यामुळें यांचा आश्रम बर्फांत बुडून गेला व त्यावर दहापंधरा फूट जाड बर्फ सांचलें. त्यामुळें यांना त्याच्यांतून बाहेर पडतां येईना. त्या वेळीं त्यांनीं तेथेंच समाधि लावली व तशा समाधिस्थ स्थितींत तेथें बसून राहिले. त्यांचे भक्त खुशालसिंग ही गोष्ट पाहून फार भिऊन गेले. रात्रंदिवस ते चिंता करूं लागले कीं, स्वामीजींची आश्रमामध्यें काय स्थिति झाली असेल, व त्यांना आतां बाहेर कसें काढायचें !

शेवटीं त्यांनीं बरेच भूतानी लोक जमवले व बरोबर फावडीं वगैरे हत्यारें घेऊन आणि बर्फांत खिळे वगैरे ठोकून व त्या खिळ्यांना दोऱ्या बांधून ते सर्व जेथें स्वामीजींचा आश्रम होता, त्या शिखरावर गेले; पण पाहतात तों आश्रमाचा कोठेंच मागमूस दिसेना. कारण सर्व आश्रम बर्फांत बुडून गेला होता. जिकडे तिकडे सपाट बर्फ दिसत होतें. शेवटीं मोठ्या मुष्किलीनें त्यांनीं अंदाजानें त्यांच्या आश्रमाची जागा शोधून काढली व तेथलें सर्व बर्फ उपसून काढून समाधिस्थ स्थितींत बेशुद्धावस्थेंत असलेल्या स्वामीजींना बाहेर काढलें. नंतर तेथून तशाच बेशुद्धावस्थेंत त्यांना त्यांनीं खालीं रुमादेवींच्या तपोवन-आश्रमाकडे नेलें. तेथें ते शुद्धीवर आले. त्यानंतर कांहीं दिवसांनीं तेथें एकदां तीर्थयात्रेला निघालेले म्हैसूरचे महाराज रुमादेवींच्या दर्शनासाठीं म्हणून गेले असतां रुमादेवींनीं त्यांचें आदरातिथ्य केलें. या वेळीं रामानंदस्वामी व नारायणस्वामीहि तेथें होते. म्हैसूरचे महाराज फार धार्मिक वृत्तीचे व भक्तिशील मनाचे असल्यामुळें, रामानंदस्वामींच्या आध्यात्मिक अनुभवांचा मोठ्या आदरानें त्यांनीं परिचय करून घेतला व त्याचा महाराजांच्या मनावर एवढा परिणाम झाला कीं, रामानंद-स्वामी, रुमादेवी व नारायणस्वामी या तिघांनींहि म्हैसूरला आपल्या राजधानींत येऊन कांहीं दिवस वास्तव्य करावें, असा त्यांनीं फार आग्रह केला.



श्रीमत् स्वामी रामानंद

# म्हैसूरच्या महाराजांची भेट


पुढें म्हैसूरचे महाराज येथून कैलासला जायला निघाले, व कैलासची यात्रा पुरी करून परत जातांना पुनः रुमादेवींच्या तपोवनांत येऊन त्या तिघांनाहि पुनः एकदां आपल्या राजधानींत येण्याबद्दल आग्रहपूर्वक विनंति केली. यानंतर म्हैसूरला पोंचल्यावर पुनः त्यांनीं तार करून या तिघांनाहि राजधानींत येण्याचें आमंत्रण दिलें. अशा रीतीनें म्हैसूरच्या महाराजांची साधुसंतांवरील खरीखुरी निष्ठा व त्यांची धर्मशील वृत्ति यांचा प्रत्यय आल्यामुळें रामानंदस्वामी, रुमादेवी व नारायणस्वामी यांनीं त्यांच्या आमंत्रणाचा स्वीकार करण्याचें ठरविलें व तीं तिघेंहिजण म्हैसूरला जाण्यास निघालीं. रामानंदस्वामी व रुमादेवी म्हैसूरला आल्याचें कळतांच महाराजांना फार आनंद झाला व ते स्वतः त्यांचें स्वागत करण्याकरतां येऊन, त्यांनीं मोठ्या आदरानें त्यांना आपल्या राजवाड्यांत नेऊन, तेथेंच त्यांच्या राहण्याची व्यवस्था केली.

म्हैसूरच्या राजवाड्यांत रामानंदस्वामींचा मुक्काम असतांना स्वतः महाराज व म्हैसूरमधले मोठमोठे विद्वान् रामानंदस्वामींच्या दर्शनाला रोज येत व त्यांचे अध्यात्मविषयावरील विचार मोठ्या भाविकतेनें श्रवण करीत. कांहीं दिवसांनीं रामानंदस्वामी व रुमादेवी यांनीं म्हैसूरमधला आपला मुक्काम

आटोपता घेण्याचें ठरविलें व तेथून बडोद्याला जायला तीं निघालीं, तेव्हां म्हैसूरच्या महाराजांनीं त्यांचा मोठा सत्कार करून त्यांस निरोप दिला. या वेळीं महाराजांनीं रामानंद-स्वामींना व रुमादेवींना स्वहस्तें हस्तिदंती मंदिर, श्रीकृष्णाची मूर्ति, अशा कांहीं मौल्यवान् वस्तु भेटीदाखल दिल्या.

बडोद्यास कांहीं दिवस वास्तव्य केल्यावर रामानंदस्वामी पुनः हिमालयावर गेले. तेथें सहा महिने ध्यानधारणेंत घालविल्यावर कांहीं भक्तांच्या आग्रहामुळें त्यांना संयुक्तप्रांतांत येऊन राहावें लागलें. या संयुक्तप्रांतांत व गुजराथेंतहि त्यांचा शिष्यसमुदाय बराच वाढला. योगसामर्थ्य प्राप्त झालेलें असलें तरी रामानंदस्वामी त्या योगसामर्थ्याचा उपयोग अद्भुत चमत्कार करून दाखविण्याकडे सहसा करीत नाहींत. पण एकदां परमार्थाची अत्यंत तळमळ लागलेल्या आपल्या एका शिष्याच्या बाबतींत एक अत्यंत आश्चर्यकारक गोष्ट त्यांनीं करून दाखविली. एके सुप्रभातीं या शिष्याला प्रणवोच्चारपूर्वक नुसता हस्तस्पर्श करून त्यांनीं त्याची कुंडलिनी जागृत केली व त्याला तत्क्षणीं समाधिसुखाची प्राप्ति करून देऊन तद्द्वारें ईश्वरदर्शन घडवलें. रामानंदस्वामींचे अनेकजण शिष्य झाले आहेत. पण अशा रीतीनें त्यांची कृपा होऊन त्यांच्या साहाय्यानें आत्मविकासाची अत्युच्च पायरी गाठण्याचें महद्भाग्य या एका शिष्याच्याच तेवढें वांट्याला आलें. यावरून अशा रीतीनें

# कृष्णाश्रम दृश्य



हें बिनसर नांवाच्या पर्वताच्या उत्तरेकडील दूरचें दृश्य आहे. या पर्वताच्या मध्यभागीं 'कृष्णाश्रम' आहे. सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतांना, आश्रमाचा बंगला स्पष्ट दिसून येतो. याच्या चारी बाजूंस घोर जंगल आहे. याची उंची समुद्रसपाटीपासून ८,००० फूट आहे. येथून चारी दिशांचें विशाल हिमालयाचें मनोहर दृश्य दिसतें.

ग्रं. सं.




एखादी व्यक्ति उच्च आध्यात्मिक भूमिकेवर स्थानापन्न व्हायला पात्र आहे, असा ईश्वरी आदेश स्वामीजींना जेव्हां होतो, तेव्हांच स्वतःच्या आध्यात्मिक शक्तीचा अशा व्यक्तीला साहाय्यभूत होण्याकरितां ते व्यय करतात, असें मानणें प्राप्त होतें.

**श्रीमत् रामानंदस्वामींचा हिमालयांतील नियम :—**

वर्षांतून दोन वेळां म्हणजे एप्रिल व नोव्हेंबरमध्यें लोकांना दर्शनाकरितां भेट देतात.

केवळ भौतिकसुखाच्या मागें लागून आपल्या आत्मिक विकासाकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ति सध्यां मानवजातीमध्यें दिवसेंदिवस वाढत चालली आहे, व त्यामुळें मानवसमाज दुःखाच्या गर्तेत अधिकाधिक खोल रुतत चालला आहे. पण भौतिकसुखाच्या मोहानें अंध बनलेल्या या मानवसमाजांतील ज्या व्यक्तींना सुदैवेंकरून रामानंदस्वामींसारख्या महात्म्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ होतो त्या खरोखरच भाग्यवान् म्हटल्या पाहिजेत; कारण या व्यक्ति तेवढ्या स्वामीजींसारख्या साक्षात्कारी सत्पुरुषाच्या अनुग्रहाचा आधार मिळतांच एकसारख्या चालू असलेल्या या जगामधल्या मोहचक्रांतून, आपापल्या पूर्वसंचितानुसार, कमीअधिक प्रमाणांत स्वतःची मुक्तता करून घेण्यास समर्थ होतात.

म्हणूनच अशा सत्पुरुषांच्या सत्संगाचा ज्यांना दैववशात् लाभ झाला व तेणेंकरून ज्यांचें कल्याण घडून आलें, त्यांनीं अशा सत्पुरुषांच्या मार्गदर्शनाचा फायदा आपल्या इतर अज्ञ बांधवांनाहि मिळावा असा सद्धेतु मनांत बाळगणें हें त्यांचें कर्तव्य आहे. या कर्तव्याच्या भावनेनेंच मीं स्वतःची व त्याबरोबरच आपल्या इतर बांधवांची आध्यात्मिक उन्नति करून घेण्यांत सतत गढून गेलेल्या या एका महात्म्याचें हें लहानसें चरित्र माझ्या अल्पमतीप्रमाणें लिहिण्याचा प्रयत्न केला आहे, तो स्वामीजी, त्यांचा शिष्यवर्ग व ठिकठिकाणचा अध्यात्मविषयाची आवड असलेला वाचकवर्ग गोड करून घेईल, अशी मला आशा आहे.



## कृष्णाश्रम



हिमालयांतील बिनसर नांवाच्या पर्वतावर हा बंगला आहे. हा समुद्रसपाटीपासून ८,००० फूट उंचीवर आहे. याच्या दक्षिण भागाच्या व्हरांड्याकडील दृश्य फारच रमणीय आहे. याच्या सभोंवार फुलाफळांच्या सुंदर बागा आहेत. हा बंगला एका भक्तानें स्वामीजींना आश्रमासाठीं दिला आहे. स्वामींनीं थोड्या दिवसांपासून येथे राहण्यास सुरुवात केली आहे.

याचें नांव **कृष्णाश्रम** ठेविलें आहे.

# परिशिष्ट

## श्रीमत् स्वामींची हिमालयांतील बारा वर्षें !

एके दिवशीं ब्राह्ममुहूर्ताच्या सुमुहूर्तावर योगनिद्रेंत ब्रह्मा, विष्णु, महेश्वर या तिन्ही देवतांचें दर्शन झाल्यावर सद्गुरूंच्या आज्ञेनें स्वामी हिमालयांत जाण्यास निघाले. सुमारें तीन वर्षांच्या तपश्चर्येनंतर अलाहाबाद येथें स्वामींस योगनिद्रेंत वरील दृष्टान्त झाला.

अलाहाबादेहून स्वामी हिमालयांत **गिरगाम** येथें गेले. तेथें एका आश्रमांत भुतिया जातीची एक तपस्विनी आश्रम बांधून तपश्चर्या करीत असलेली स्वामींच्या दृष्टीस पडली. तिचें प्रथम दर्शन स्वामींस झालें. ती तपस्विनी कैलासास जाणाऱ्या-येणाऱ्यांचा आदरसत्कार करते. या वेळीं स्वामींच्या बरोबर नारायणस्वामीहि होते. या आश्रमांत विश्रांति घेऊन नंतर स्वामी **राथी** येथें येऊन पोंचले. या ठिकाणीं मुक्काम करून नंतर बर्फू येथें गेले. बर्फूच्या दक्षिणेस तीन मैलांवर भूर्जपत्रांचें एक दाट जंगल आहे. त्या जंगलांत रंगीबेरंगी सुवासिक अशीं नाना प्रकारचीं असंख्य फुलझाडें आहेत. त्याच फुलझाडांमध्यें एक प्रकारच्या **पिवळ्या फुलांचीं विषारी झाडें आहेत.**

तिबेटचे व्यापारी लोक हिंदुस्थानांतून पुष्कळ प्रकारच्या वस्तु तिबेटास विक्रीकरितां घेऊन जातात. तिकडे बकऱ्यांवर ओझें लादून सर्व वस्तु तिबेटास व्यापारी लोक घेऊन जातात. ते व्यापारी कधीं कधीं आपल्या बकऱ्यांचा तांडा चरावयास या भूर्जपत्रांच्या जंगलांत सोडतात. तीं बकरीं अनेक प्रकारच्या वनस्पति खातात; परंतु या पिवळ्या फुलांच्या विषारी झाडास स्पर्श मुळींच करीत नाहींत. परमेश्वरानें बकऱ्यांनाच काय पण सर्व मुक्या जनावरांना विषारी झाडें ओळखण्याचें ज्ञान स्वयंभूच दिलेलें असतें असें म्हणावयास हरकत नाहीं. इकडील जनावरें देखील धोत्र्याच्या वनस्पतीस मुळींच शिवत नाहींत. त्या पिवळ्या विषारी फुलझाडास जर एखाद्या बकऱ्याचा स्पर्श चुकून झालाच तर तें बकरें ताबडतोब प्राणास मुकतें असा अनुभव तिबेटी लोकांस अनेक वेळां आला आहे.

## लोखंडाचें सोनें होणारी दिव्य वनस्पति

या जंगलांत लोखंडाचें सोनें होणारी दिव्य वनस्पतीहि आहे. पण अजून कोणा मनुष्यास ती प्रत्यक्ष दिसली नाहीं. तर मग हा शोध लागला कशावरून? तिकडील जोहारी लोक कधीं कधीं एखाद्या बकऱ्याच्या पायाला लोखंडाचा तुकडा बांधतात व बकरीं चरावयास सोडतात. क्वचित् प्रसंगीं एखाद्या बकऱ्याचा पाय त्या दिव्य वनस्पतीस लागतो व लोखंडाचें सोनें होतें!

तिकडे नेहमीं बर्फ पडत असल्यामुळें व क्वचितच त्या दिव्य वनस्पतीस स्पर्श होण्याचा महत्प्रयासानें संभव असल्यामुळें जोहारी लोक वरील प्रयोग क्वचितच करतात. अथवा पाश्चिमात्य धाडसी शोधकांप्रमाणें आपलें सर्व वित्त व आयुष्य पणास लावणारे तिकडे कोणीहि नवकोटनारायण नसावेत असेंच वाटतें.

भूर्जपत्रांच्या जंगलाच्या उत्तरेस १५ ते २० मैलांच्या अंतरावर नंदादेवीचें शिखर आहे. याच शिखरावर जर्मन लोक जाण्याचा प्रयत्न करीत होते, पण जाऊं शकले नाहींत. १९३९ सालीं मे महिन्यांत चार जर्मन लोक या शिखरावर जाण्याचा प्रयत्न करीत होते; पण त्यांपैकीं दोन जर्मन बर्फांत पडून मेले. वर्तमानपत्राच्या वाचकांस वरील हकीगत वाचावयास मिळाली असेलच.

बर्फू गांवचे चारी बाजूंस हिमालय आहे. हात, पाय, तोंड वगैरे सर्व अवयव फारच गारठून जातात. सर्व शरीर गारठ्यानें जवळ जवळ बधिर होतें. गारठ्यामुळें कधीं कधीं सुया टोंचल्याप्रमाणें सर्व शरिरास त्रास होतो. बर्फू गांवांत त्रिलोकसिंग या नांवाचा जव्हारी जातीचा एक सात्त्विक माणूस आहे. त्यानें स्वामींचा उत्तम सत्कार केला. या गांवांत दोन-तीन दिवस विश्रांति घेऊन तेथून स्वामी मिलम गांवास गेले. अखेरचेंच हें गांव; पुढें गांव नाहीं.

## धोक्याची सूचना

मध्यंतरीं तिबेटास जाणारे व्यापारी लोक स्वामींना भेटले. या व्यापाऱ्यांना तिबेटास विक्रीकरतां हरएक प्रकारचा माल बकऱ्यांवर लादून नेतांना स्वामींनीं पाहिलें. हजार हजार बकरीं या व्यापाऱ्यांच्या बरोबर ओझें वाहण्याकरतां असतात.

" स्वामी, पुढें जाऊं नका, धोका आहे ! " असें ते व्यापारी स्वामींस म्हणाले. " समोरच्या उंच भागावर आपण चढून गेलात व तेथें जर थकल्यामुळें सहज थोडी निद्रा घेतलीत तर तेथील विषारी हवेमुळें माणसेंच काय पण बकरीं, वनगाई, खेचरें, वगैरे जनावरें कायमची महानिद्रा घेतात. "

स्वामींनीं व्यापाऱ्यांच्या या धोक्याच्या सूचनेकडे लक्ष दिलें नाहीं. ते तसेंच पुढें चालूं लागले. सर्व रस्ता बर्फमय होता. मार्ग शोधून काढणें कठीण होतें. तरी पण पुढें गेलेल्या तिबेटी लोकांच्या व बकऱ्यांच्या पावलांच्या खुणांवरून स्वामी मार्ग क्रमूं लागले.

स्वामी उटाधरा शिखरावर जाऊन पोंहोचले. या शिखरावरून हिमालयाचीं आणखी उंच उंच शिखरें दिसतात व तिबेटहि दिसतें. जणूं कांहीं एखाद्या विशाल मैदानावर तिबेट वसलें आहे असें दिसतें.

तिबेटकडे पाहिलें म्हणजे आपण या वेळीं क्षणभर परलोकच पाहत आहोंत असा भास होतो; आणि मन किती तरी वेळ मंत्रमुग्ध होतें.

स्वामींनीं सहज कुतूहल-नजरेनें मागें वळून पाहिलें तेव्हां त्यांचें त्यांनाच खूप आश्चर्य वाटलें. आपण येवढ्या खडतर मार्गांतून व इतक्या उंच उंच शिखरांतून कसें आलों या विचारानें त्यांचें त्यांनाच नवल वाटलें. विशाल व उंच अशा किल्ल्यावर जसे कांहीं आपण उभे आहोंत असेंहि स्वामींस वाटत होतें.

स्वामी मिलम गांवापासून जेव्हां पुढें चालूं लागले त्या ठिकाणापासून मध्यंतरीं गांव मुळींच नसल्यामुळें व मध्यंतरीं जोहारी लोकांनीं धोक्याची सूचना स्वामींस दिल्यामुळें तें महानिद्रा टाळण्याचें स्थळ ओलांडून जाण्यास स्वामींस अपरिमित श्रम झाले. जोहारी व्यापाऱ्यांनीं धोक्याची जी जागा सांगितली होती त्या ठिकाणावर आल्यावर थकव्यामुळें स्वामींस खरोखरीच झोप आली होती; परंतु त्या विषारी हवेच्या स्थळांतून स्वामी मोठ्या त्वरेनें मार्ग चालत होते. इतर लोकांस जो मार्ग चालण्यास सुमारें तीन दिवस लागतात तेवढा मार्ग आक्रमण करण्यास स्वामीजींस एक दिवस पुरे होतो. येवढी मोठी मार्ग आक्रमण्याची स्वामींची अचाट व अलौकिक शक्ति आहे.

जोहारी लोकांनीं जें स्थळ विषारी हवेचें सांगितलें होतें त्या स्थळीं झोप न घेतां स्वामी तसेंच पुढें चालत आल्यामुळें व त्या जागीं चढहि विलक्षण चढावा लागत असल्यामुळें थोडें बसावें, थोडें पुन्हा चालावें असें करणें स्वामींस भाग पडत होतें. तरी पण वरील उच्च शिखर स्वामींनीं जेव्हां गांठलें व तिबेटची शोभा त्यांच्या अवलोकनांत जेव्हां आली तेव्हां सर्व श्रम परिहार झाले व त्यांना स्वर्गीय आनंद झाला.

उटाधरा, कोंगडीबिंगडी व जयंती हीं तीन शिखरें ओलांडण्यास इतर लोकांस तीन दिवस लागतात. तींच हीं तीन शिखरें स्वामींनीं आपल्या अघटित चालीनें जलद चालून अवध्या एका दिवसांत सर्व प्रवास केला. कारण आकाशांतून बर्फाचा वर्षाव केव्हां व किती होईल याचा नेम नसल्याची दुसरी धोक्याची सूचनाहि स्वामींस जोहारी लोकांकडून आधींच मिळाली होती. नंतर थाजांग येथें स्वामी जाऊन पोंचले. थाजांग तिबेटमध्यें आहे. तिबेटचें मैदान समुद्र सपाटीपासून १६,००० फूट उंच आहे. तिबेटच्या राजाचें नांव दलाई लामा असें आहे.

हा प्रांत ल्हासा गव्हर्नमेंटचा आहे. हें स्थान जोहारी लोकांचें व त्यांच्या ओझें वाहून नेणाऱ्या बकऱ्यांचें विश्रांति घेण्याचें स्थान आहे. येथें जोहारी लोक तंबूत विश्रांति घेत

बसले होते व तंबूच्या बाहेर ओझें वाहणाऱ्या चार-पांच हजार बकऱ्यांचा तांडाहि विश्रांति घेत बसलेला स्वामींच्या नजरेस आला. आधींच एक यात्रेकरू त्या जोहारी लोकांच्या तंबूंत बर्फानें गारठल्यामुळें रात्रभर मरणोन्मुख स्थितींत आकुंचित जागेमुळें गुडघ्यावर डोकें टेकून बसला होता. तो प्रातःकालीं मरण पावला. त्याची अखेरची व्यवस्था स्वामींनींच केली.

## तिबेटच्या लोकांची राहणी कशी असते?

चामुरगाईच्या शेपटीच्या केसांचा कपडा तयार करतात व त्याच कपड्याचे मोठमोठे तंबू तयार करतात व तंबूस लागणारे दोरहि त्याच केसांचे करतात. ते दोर फार मजबूत असतात. आपल्या इकडे आपण ज्यास वनगाई म्हणतो त्यांस तिबेटमध्यें चामुरगाई असें म्हणतात. आपल्या इकडे वनगाईच्या शेपटीच्या केसांच्या फक्त चौऱ्या व गंगावनेंच करतात; पण तिकडे त्याच चामुरगाईच्या केसांचा कपडा करून त्याचे तंबू व दोर बनवितात. ही कल्पना खरोखरीच प्रशंसनीय आहे; अथवा 'गरज ही कल्पकतेची आई' ही इंग्रजी म्हण तंतोतंत सत्य आहे असें म्हणणेंच योग्य होईल.

चामुरगाईच्या त्या शेपटीच्या केसांपासून तयार केलेल्या कपड्याच्या तंबूंचा दुसरा एक मोठा उपयोग आहे. तो हाच कीं, तिकडे वारंवार बर्फवृष्टि होत असते; तेव्हां त्या तंबूवर

कितीहि बर्फ पडला तरी तो तंबू भिजत नाहीं व कुजतहि नाहीं. बर्फवृष्टीनंतर तंबूवर पडलेला बर्फ एकदां झाडून टाकला कीं, ताबडतोब तंबू पूर्ववत् जवळजवळ कोरडा होतो. तिबेटमध्यें लाकडांचीं व दगडांचीं घरें तयार होत नाहींत; पहाड खोदून लहान लहान घरें तिबेटचे लोक तयार करतात.

तिबेटांत एक एक फूट उंचीचीं काटेरी झाडें विपुल आहेत. तीं झाडें ओलीं असतांनाच तिकडील लोक उपटतात व स्वैंपाक करण्याकरितां व पाणी तापविण्याकरितां जाळतात. ओलींच झाडें धाड धाड पेट घेतात हें विशेष आहे. तेथून **ग्यानीमामंडी** येथें स्वामी गेले. ग्यानीमामंडीहून कैलासच्या-जवळ येतांच दुरूनच स्वामींस कैलासचें दर्शन झालें. कैलासच्या त्या पवित्र व मोहक अशा प्रथम दर्शनानें स्वामींच्या नेत्रांत एकदम आनंदाश्रु आले व स्वामी क्षणभर ध्यानमग्न झाले.

ग्यानीमामंडी येथें पोंचण्यापूर्वी वाटेंत २५।३० हत्यारबंद दरोडेखोरांनीं स्वामींचेभोंवतीं गराडा घातला. " जें जवळ असेल तें ताबडतोब आमच्या स्वाधीन करा " असें ते क्रूर दरोडेखोर दरडावून म्हणाले. तें पाहून बरोबर असलेले नारायणस्वामी हसले व त्यांनीं जवळ असलेली फक्त खडी-साखर त्या सर्व दरोडेखोरांच्या हातावर ठेवली. ती खाऊन सर्वजण खूप खूष झाले. कारण ? तिकडे खडीसाखर हा

पदार्थ नुसता ठाऊक सुद्धां नाहीं; मग पहावयास मिळणार कसा ? पण तो पदार्थ प्रत्यक्ष चाखल्यामुळें अमृततुल्य गोड लागल्यास नवल तें कसलें ? स्वामींच्या जवळ आणखी कांहीं नाहीं हें अजमावून व स्वामींस आनंदानें प्रणाम करून ते दरोडेखोर परत गेले.

## तिबेटच्या लोकांचा राक्षसी आहार !

तिबेटचे लोक तिकडील बकऱ्याचें कच्चेंच मांस नेहमीं खातात. चहा खूप उकळावयाचा व त्यांत तूप व मीठ (सैंधव) मिसळून त्या तसल्या चहाबरोबर कच्चें मांस खातात. तिकडील हवेंत जबर पाचकशक्ति आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. तिबेटमध्यें मिरची मुळींच मिळत नाहीं. इकडे ज्यास सैंधव म्हणतात तें सैंधव (मीठ) तिकडे खाणींत सापडतें. कैलासाच्या पाठीमागें पश्चिमेस सुमारें १०० मैलांवर सैंधवा ( मीठा )च्या खाणी आहेत.

आदले दिवशीं **न्यांडी** येथें स्वामींनीं सायंकाळ झाल्यामुळें मुक्काम केला. न्यांडीपासून सुमारें ७ मैल कैलास पर्वत आहे. कैलास पर्वतावर **तारचन** नांवाची गुंफा आहे. त्या गुंफेमध्यें स्वामी विश्रांति घेण्यास राहिले.

कैलासचा आकार लिंगासारखा आहे व त्याचा घेर ३२ मैल आहे. कैलास पर्वताच्या बाजूस ७ गुंफा आहेत,

त्यांमध्यें तारचन हीच गुंफा मोठी आहे. या गुंफेमध्यें एक **लामा** आहे तो सर्व गुंफांचा राजा आहे. तिकडे राजास लामा म्हणतात. प्रत्येक वर्षी येथें एक मोठा मेळा भरतो. मेळा भरला म्हणजे लुटारू लोक बाजारावर हल्ला करतात. येथून स्वामी **दिराफुक** गुंफेमध्यें गेलें. रात्रौ विश्रांति घेऊन प्रात:काळीं स्वामी **गौरीकुंड**कडे जाण्यास निघाले. **गौरीकुंड** कैलासच्या अगदीं जवळ आहे. चढ मात्र अगदीं उभा चढावा लागतो. प्राणवायु कमी मिळतो. थकवा फार येतो. स्वामी **गौरीकुंडावर** येऊन पोंचले.

**गौरीकुंडावर** क्षणोक्षणीं वादळ सुटत असतें. त्यामुळें बर्फहि फारच पडतें; गारठा फारच असतो व तो सहन होत नाहीं. **गौरीकुंड** बर्फमय आहे. ज्यांना या पवित्र कुंडांत स्नान करावयाचें असतें त्यांना बर्फ फोडून पाणी वर काढून स्नान करावें लागतें. ज्यांना सहन होत नाहीं ते नुसतें आचमन करतात. गौरीकुंडाच्या उत्तरेस पहाडाच्या बाजूस मोठमोठ्या दगडाच्या गुंफा आहेत. तिबेटचे लोक त्या गुंफांची पूजा करतात.

हजार हजार वर्षे तपश्चर्या करीत बसलेले **महान् महान् योगी** त्या गुंफांमध्यें आहेत अशी तिबेटी लोकांची समजूत आहे. पुण्यवान् पुरुषासच ते योगी दर्शन देतात, बाकी नेहमीं अदृश्य असतात.

तेथें पहाडाच्या मोठमोठ्या खडकांवर तपस्वी अदृश्य बसलेले असतात. त्यांची इच्छा झाल्यास दगडासहित इच्छित स्थळीं ते जातात. दगड अधांत्रीं जातांना तेथील लोकांना कधीं कधीं दिसतात.

गौरीकुंडावर बर्फाचा जो जाड थर जमतो तो फोडून बाजूस केला व आंतील पाणी वर काढून स्नान केलें. मग कैलास शिखराचें दर्शन घेऊन स्वामी परत फिरले. नंतर **झिंतुलफुक** गुंफेमध्यें स्वामी आले. तेथें विश्रांति घेऊन पुढें **जेंगटा** गुंफेमध्यें आले.

जेंगटा गुंफेमध्यें 'सिद्धनागार्जुन' या महापुरुषानें पाली भाषेंत लिहिलेले मोठमोठे अपूर्व ग्रंथ आहेत. सहा-सातशें वर्षांपूर्वींचे ते ग्रंथ आहेत. तांत्रिक विद्या ज्यास म्हणतात ती माहिती या ग्रंथांत विपुल आहे. अद्भुत चमत्कार, मंत्रानें नव्हे तर तंत्रानें, कसे करावे हें त्या ग्रंथांत स्पष्ट केलेलें आहे. माणसानें आकाशांत अधांत्रीं भ्रमण कसें करावें, भर दिवसा 'अदृश्य' कसें व्हावें, अशा प्रकारची शास्त्रीय माहिती त्या ग्रंथांत विपुल आहे. तेथील लोक ते ग्रंथ कोणास देत नाहींत. पुष्कळ लोक मिळविण्याचे ते प्रयत्न करून गेले. इकडील प्राचीन इतिहाससंशोधकांनीं प्रयत्न करून सर्व भाषेंत त्या ग्रंथांचीं भाषांतरें करावींत म्हणजे जगावर मोठे उपकार होतील.

## दीड इंच लांबीचा गव्हाचा दाणा

या गुंफेमध्यें तारचन गुंफेच्या लामानें दीड इंच लांबीचा गव्हाचा दाणा कांचेच्या कपाटांत ठेवलेला आहे. स्वामींना तेथील लोकांनीं सांगितलें कीं, हा सत्ययुगांतील गहूं आहे. परत येतांना पुन्हा तारचन गुंफेमध्यें स्वामी आले.

कैलासास जाते वेळीं ज्या दिवशीं येथून गेले त्याच रात्रौ डाकू लोकांनीं भयंकर हल्ला करून दोन-चार खूनहि पाडले. तारचन गुंफेच्या लामानें घोडेस्वार पाठवून ल्हासा गव्हर्मेंट-कडून मदत मागविली तेव्हां कुठें शांतता झाली. त्या वेळचे रक्ताचे डाग भिंतींवर व खांबांवर स्वामींस या वेळींहि दिसले.

तारचन गुंफेंतील लामा योगीहि आहे व राजाहि आहे. या लामानें स्वामींचा सत्कार चांगला केला. फळफळावळें, चहा वगैरे देऊन दुसरे दिवशीं सोबतीस आपले खास शिपाई देऊन स्वामींस तकलाकोटला जाण्यास निरोप दिला.

पूर्व आणि दक्षिण या दिशांच्या कोपऱ्यांत मांधाता व उत्तरेस कैलास पर्वत आहे. या दोन्ही पर्वतांच्यामध्यें मानस सरोवर व राक्षसताल आहे. कैलासहून तकलाकोट येथें जाण्यास दोन दिवस लागतात. मध्यंतरीं ‘ मानस सरोवर ’ येथें चीवगुंफा आहे. तेथें विश्रांतीस्तव स्वामी राहिले. बरोबरचे शिपाई पुढें गेले. पूर्वेस मानस सरोवर व पश्चिमेस राक्षसताल आहे व मधून मार्ग आहे.

कैलास पर्वत उचलून नेण्याचा रावणानें ज्या वेळीं प्रयत्न केला त्या वेळीं राक्षसताल त्यानें निर्माण केला. रामायणांत याविषयीं माहिती आहे.

## दैविक चमत्कार

मानस सरोवर व त्याच्या आजूबाजूच्या प्रदेशाकडे पाहिलें कीं, मन प्रफुल्लित होतें. पण राक्षसतालकडे पाहिलें कीं, मन भयभीत होतें. रात्रौ विश्रांति घेऊन **तकलाकोट** येथें जाण्यास स्वामी निघाले. वाटेंत भयंकर वादळ सुटल्यामुळें व आकाशांतून बर्फवृष्टि सुरू झाल्यामुळें दोन्हीहि स्वामींस रात्रभर रस्त्यावरच बसून राहवें लागलें. जवळपास झाड नसल्यामुळें व अंगावर वस्त्रहि नेहमींचेंच साधें असल्यामुळें बेशुद्धावस्थेंत रात्र कंठावी लागली.

सूर्यकिरणांच्या उष्णतेनें जेव्हां दुसरे दिवशीं रस्त्यावरील सर्व बर्फ वितळून रस्ता साफ झाला तेव्हां स्वामी मार्ग चालूं लागले. सायंकाळीं तकलाकोट येथें स्वामी येऊन पोंचले. **तकलाकोट**च्या बाजूस झाडझुडूप मुळींच नाहीं. टेकडीवर बुद्धधर्मीय लोकांची एक गुंफा आहे. दुसऱ्या टेकडीवर कलेक्टर राहण्याचें ठिकाण आहे. **ल्हासा** गव्हर्नमेंटतर्फे कलेक्टर येथील सर्व व्यवस्था पाहत असतो. तकलाकोटच्या जवळ कर्णाली नदी आहे. वर्षांतून दोन वेळ बाजार भरत असतो. येथें व्यापार करण्याकरितां भूतिया लोक देशांतून

यतात. तकलाकोटच्या उत्तरेस १२ मैलांवर खोचरनाथजवळ एक मोठी दोन मजली गुंफा आहे. दगडमातीनें ती तयार केली आहे. त्या गुंफेमध्यें पंचधातूंच्या तीन मूर्ति आहेत. त्या तीन मूर्ति ज्या सिंहासनावर आहेत तें सिंहासन सुमारें २५ फूट लांब व पांच फूट रुंद आहे. त्या तीन मूर्तींची उंची २०।२५फूट आहे. सिंहासनावरील कमलफुल व पऱ्यांचें कोरीव काम अवर्णनीय आहे. पाहणारे सर्व लोक आश्चर्यचकित होतात. म्हैसूरचे महाराज कैलासदर्शनास ज्या वेळीं आले होते, तेव्हां ते देखील म्हणाले कीं जगांत कुठेंहि इतक्या कौशल्याचें काम मला पाहावयास मिळालें नाहीं.

## दैविक चमत्कार !

पाहणाऱ्याच्या भावनेप्रमाणें त्यास ह्या तीन मूर्तींचीं तीन विविध रूपें दिसतात. कोणास महाकाली, महासरस्वती व महालक्ष्मीचीं रूपें दिसतात. तर त्याच वेळीं दुसऱ्या माणसास श्रीराम, लक्ष्मण व सीता, अशा स्वरूपांत, तर कोणास गौतमबुद्धाच्याच स्वरूपांत तिन्हीहि मूर्ति दिसतात. चमत्कार हा कीं, एकाच वेळीं दर्शन घेणाऱ्या भाविकास त्याच्या मनांतल्या इष्ट देवतेच्या स्वरूपांत दर्शन देतात. या तीन मूर्ति घडविणारा कारागीर प्रतिविश्वकर्माच असावा असें सर्वतोमुखीं ऐकावयास सापडतें.

स्वामींनीं तेथील लोकांस मूर्ति कोणत्या कालांतील असाव्यात असा प्रश्न केला. "सत्य युगांतील आहेत" असें उत्तर मिळालें. दुसरा एकजण म्हणाला, "अशोक राजाला पुष्कळ राण्या होत्या, त्यांमध्यें तिबेटच्या राजाची कन्या त्याची एक राणी होती. तिनें आपल्या पदरच्या कुशल कारागिरांकडून या तीन मूर्ति घडवून घेतल्या."

उद्देश हाच कीं, भाविक जनांस त्यांच्या भावनेप्रमाणें त्यांस त्या त्या देवतांचें दर्शन व्हावें.

## दुसरें नवल

हजारों मण वजनाचें तें अखंड सिंहासन येवढ्या उंच, अरुंद व कठीण मार्गांतून कसें व कोणी आणलें असावें? **खोचरनाथ**पासून ल्हासा सात-आठशें मैल आहे. तेथून खेचरें, वनगाई, बकरींच ओझीं वाहत असतात. त्यांच्यावर लादून आणणें दुरापास्त आहे.

## पुनर्जन्माचें वृत्त पटविणारा योगी

२६ वर्षांचा अत्यंत तेजस्वी योगी याच गुंफेमध्यें आहे. त्याची हकीकत अशी आहे कीं, बालपणीं आपल्या मातापित्यांना तो म्हणाला, "मीं पूर्वजन्मीं योगबलावर तीनशें वर्षें जगून मोठी तपश्चर्या केली होती." त्या ठिकाणच्या सर्व

खाणाखुणा, त्या योग्याची जपमाळा, आसन वगैरे कसें आहे" हें सांगून लोकांस पटविलें.

तेव्हां त्या बालकास या गुंफेमध्यें त्या महान् योग्याच्या गादीवर बसविलें. हा तरुण योगी येथील सर्व लामांचा मुख्य लामा आहे व येथील सर्व गुंफांचा तो एकटा पूर्ण अधिकारी आहे.

या तेजस्वी योग्यानें निद्रादेवीस जिंकलें आहे. यास झोप घेतांना कोणींहि पाहिलें नाहीं. स्वामींची व या महान् योग्याची भेट झाली. स्वामींचें आदरातिथ्य त्यांनें उत्तम केलें. हा योगी अहोरात्र आपल्या इष्टदेवतेचा जप करीत असतो.

या गुंफेच्या पूर्वेस पशुपतिनाथ तीर्थास जाण्याचा रस्ता आहे. नेपाळांत हीं दोन्हीहि तीर्थें आहेत.

येथून निघून स्वामी पुन्हा तकलाकोट येथें आले. लिपुलेख ओलांडून गर्ब्यांग येथें आले.

नंतर श्रीरुमादेवींच्या तपोवन-आश्रमांत स्वामी गेले. श्रीरुमादेवी श्रीमत् रामकृष्ण परमहंस यांच्या पट्टशिष्या आहेत. अर्थात् श्रीस्वामी विवेकानंद यांच्या त्या गुरुभागिनी होत. श्रीरुमादेवींनीं हिमालयांत ३६ वर्षें तपश्चर्या केली आहे.

कमलपुष्प कोणी दिल्याचें रुमादेवींस स्वप्न पडलें. दुसरें दिवशीं त्या स्वप्नाचा त्या विचार करीत असतां एकदम उभयतां स्वामी त्यांचेपुढें उभे राहिले.

रुमादेवींच्या आग्रहामुळें तेथें तीन वर्षें स्वामी त्या आश्रमांत राहिले व त्यांनीं तपश्चर्या केली. त्या तपाचें फळ म्हणून स्वामींस **ध्यानसिद्धि** प्राप्त झाली. या आश्रमाजवळ **काळी** नांवाची नदी आहे. त्या नदीचें वळण व बाजूची वनश्री फारच आल्हादकारक आहे. त्या नदीच्या कडेला मोठमोठे खडक आहेत. त्यावर बसून स्वामी तपश्चर्या करीत होते. या ठिकाणीं भूतानचे पुष्कळ लोक स्वामींचे दर्शनास येत होते, व पुष्कळ भक्त बनले.

या भक्तांनीं स्वामींस ब्यास चौदास स्थळीं नेलें. प्राचीनकाळीं भगवान् व्यासमुनींनीं या स्थळीं तपश्चर्या केली होती म्हणून या स्थळास ब्यास चौदास नांव प्राप्त झालें आहे. या पर्वताच्या शिखरावर एक मोठें मैदान आहे. या ठिकाणीं भूतीया लोक एक एक दगड घेऊन खूप उंच मंदिरासारखे रचतात व त्यास देव मानून पूजा करतात. ही **खास पऱ्यांची जागा** आहे असें त्यांचें मत आहे. याच ठिकाणाचे उत्तरेस एक घोर जंगल आहे. त्या जंगलांत एक मोठा मणिधर नाग आहे. काळोख्या रात्रीं त्या जंगलांत कधीं कधीं विद्युल्लतेप्रमाणें प्रकाश पडलेला पुष्कळांच्या दृष्टीस पडतो. ब्यास चौदासला पुष्कळ भक्तांच्या आग्रहामुळें स्वामी राहिले. भक्त लोकांनीं स्वामींना प्रथम एक झोपडी बांधून दिली. ती जागा भयाण व धोक्याची आहे असेंहि कांहींजणांनीं सांगितलें. पण

एकदां जो निश्चय झाला, तो आम्ही बदलत नाहीं असें स्वामी म्हणाले.

या जागेंत एका दगडावर एक मुलगा मुरली वाजवीत बसला होता. इतक्यांत तो दगड हालूं लागला. तो मुलगा घाबरून इकडे तिकडे पाहूं लागला. इतक्यांत दगडाखालून एक भयंकर व मोठा नाग निघून त्या मुलासमोर डोलूं लागला. त्यास पाहतांच भीतीनें तो मुलगा तात्काळ मरण पावला. अशी धोक्याची जागा आहे तरी स्वामींनीं त्याच ठिकाणीं शारदा-मंदिर बांधलें आहे.

म्हैसूरचे महाराज कैलासला आले त्या वेळीं त्यांनीं यात्रे-करूंचे व्यवस्थेकरितां या आश्रमास म्हणजे श्रीरुमादेवी व श्रीरामानंद यांच्या आश्रमास १०,००० रुपयांची देणगी दिली आहे.

## हिमालयांत दिसलेले चमत्कार

हिमालयांत हिंवाळ्यांत बर्फ फारच पडत असतें. अशा वेळीं अनेक पऱ्या आनंदानें या शिखरावरून त्या शिखरावर मनमोहक गातांना व नाचतांना तिकडील पुष्कळ लोकांना दिसतात.

गुजराथ प्रांतांतील श्रीरामानंद स्वामींचे सुमारें दोनशें शिष्यगण त्यांचेबरोबर हिमालयांत गेले होते त्यांपैकीं एक-दोघांनीं चांदण्या रात्रीं प्रत्यक्ष पऱ्या पाहिल्या आहेत.

स्वामी ज्या ठिकाणीं राहत होते त्या ठिकाणच्या समोर-च्याच पहाडावर घडलेला प्रकार असा आहे:—एका अकरा वर्षांच्या सुंदर मुलाची बकरी चरत असतांना त्यास सहज झोप लागली. जागा होऊन पाहतो तों त्याचेसभोंवार अनेक पऱ्या उभ्या असलेल्या त्यास दिसल्या. त्यांना आकस्मिक पाहतांच तो मुलगा एकदम भ्याला व त्याचे अंगास कंप सुटला. त्याच स्थितींत अजूनहि तो मुलगा जिवंत आहे.

हिमालयांत स्वामींचा आश्रम ज्या ठिकाणीं आहे त्या ठिकाणापासून जवळच एक उंच ठिकाण आहे. तें ठिकाण अत्यंत शांत व रम्य आहे. तेथून चारी बाजूंस नजर फिरविली असतां हिमालयाचें दृश्य मनोहर दिसतें. त्या ठिकाणीं स्वामी एके दिवशीं ब्राह्ममुहूर्ताच्या वेळेवर नित्य नियमाप्रमाणें ध्यानस्थ होण्यास निघाले असतां कांहीं अंतरावर समोरून एक महान् पुरुष येत असतांना दिसला. तो जटाधारी महान् पुरुष नग्न होता. त्याची उंची ७-८ फूट होती, त्यास पाहतांच स्वामींस भय वाटलें. स्वामींनीं त्यास प्रणाम केला. त्या महान् पुरुषानें हात वर करून स्वामींस आशीर्वाद दिला. स्वामी त्या महान् पुरुषाकडे एकाग्र मनानें पाहत उभे होते. तो महान् पुरुष दिसतां, दिसतां, एकदम अदृश्य झाला.

## अजस्र कमलफूल

हिमालयांत खेला गांवाजवळ पहाडावर सरस्वतीकुंडांत एक मोठें कमलफूल आहे. त्याचा सुवास अदमासें एक फर्लांगभर आजूबाजूच्या मनुष्यांस येतो. सहा महिन्यांनीं तें एकदांच फुलतें.

त्या कमलफुलाच्या पाकळ्यांत एक मनुष्य सहज बसेल एवढा मोठा त्याचा आकार आहे. तें तोडावयास कोणी जाऊं शकत नाहीं. सरोवराच्या मध्यभागीं तें आहे. पाण्याचा देखावा व बाजूचे खडक फार भयानक आहेत. चांदण्या रात्रीं **स्वर्गावरून अप्सरा** या सरोवरावर विहार करण्यास येतात असें म्हणतात.

हिमालयांत सुंदर व सुवासिक गुलाबांचे प्रचंड ताफे रस्त्याच्या दोहों बाजूंस सात-सात व दहा-दहा मैल असें पसरलेले आहेत. या ठिकाणांतून प्रवास करतांना स्वर्गीय नंदनवनाची आठवण होऊन मन प्रसन्न होतें.

## देवतांचीं दिव्य विमानें !

आपल्या ध्येयप्राप्तीकरितां स्वामी ज्या वेळीं मानस सरोवराजवळच्या गुसल गुंफेमध्यें बसले होते त्या वेळीं एके दिवशीं आकाशांतून जिकडे तिकडे खूपच बर्फ पडलें होतें. त्या बर्फानें मानस सरोवर व बाजूचा सर्व प्रदेश जणूं काय एक बर्फमय

सपाट मैदानच झालें होतें. ५६ मैलांचा मानस सरोवरचा घेर खरा, पण तोसुद्धां बर्फमय सपाट मैदान झाला होता. त्या दिवशीं ब्राह्ममुहूर्ताच्या वेळेवर मानस सरोवराच्या त्या बर्फमय सपाट मैदानावर २।३ मैल स्वामी फिरावयास गेले होते; तेव्हां स्वर्गांतून एक प्रकाशमान् विमान येतांना त्यांना दिसलें; त्यांत देव-देवता बसलेल्या दिसत होत्या. त्यांचें शरीर सर्व प्रकाशमय होतें व स्त्री किंवा पुरुष ओळखावयास येत नव्हतें. या वेळीं मानस सरोवरावरील सभोंवारचा सर्व प्रांतसुद्धां शुभ्र दिसत होता. तें विमान मानससरोवरावरून विहार करून हळूहळू आकाशांत उंच उंच जातां जातां अदृश्य झालें. अशा प्रकारचीं विमानें व देवदेवतांचें दर्शन तिकडे राहणाऱ्या पुण्यवान् पुरुषास केव्हां केव्हां होत असतें असें सांगतात.

कोणा महान् पुरुषाच्या दोन फूट लांब पावलाच्या खुणा हिमालयांत बर्फमय मार्गावर दोन-दोन मैल अंतरावर दिसतात अशी माहिती हिमालयावर उड्डाण करण्यास गेलेल्या जर्मन लोकांनीं थोडे दिवसांपूर्वीं वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केलेली असंख्य वाचकांस माहीत असेलच.

दोन-तीन महिनेच हिमालयावर जाऊन जर अनेक चमत्कार त्या लोकांच्या दृष्टीस पडतात, तर हिमालयांत सतत राहणाऱ्या पुण्य पुरुषास त्याहून अद्भुत असे चमत्कार

पाहावयास सापडत असतीलच असें म्हणावयास संदेह धरण्याचें कारण नाहीं.

## हिमालय काय आहे ?

हिमालयांतील ब्रह्मानंदाचें वर्णन करतां करतां महान् महान् योगी व महान् महान् पंडित देखील थकून जातील.

श्रीव्यासमुनींची ती तपोभूमि आहे. भगवान् श्रीकृष्णाचे केवळ पंचप्राण असे पांडव ज्या मार्गानें दिव्य देह धारण करून अखंड सुख उपभोगण्यास स्वर्गास गेले तें हें पवित्र स्थान आहे. सत्ययुगांतील राजा हरिश्चंद्राचा ज्या काशीक्षेत्रांत बायकामुलांसह उद्धार झाला त्या काशी-क्षेत्रांतील श्रीविश्वेश्वराचें तें आनंदधाम आहे. त्याच काशी-क्षेत्रांतील शुद्ध व पवित्र गंगेचें तें पुण्यमय उगमस्थान आहे. भगवान् रामकृष्ण परमहंस यांचे पट्टशिष्य, ज्यांनीं जगांतील अखिल धर्मांच्या परिषदेंत सर्व धर्मांहून फक्त एकच हिंदु धर्म व त्याचीं सर्व तत्त्वें श्रेष्ठ आहेत असें चिकागो येथें भरलेल्या परिषदेंत मोठमोठ्या सर्व पंडितांस ठासून सांगितलें व पटवून दिले, त्या श्रीस्वामीविवेकानंदांस देखील सिद्धि मिळवून देणारी ती तपोभूमि आहे. अगदीं अलीकडील इंदोर, ग्वाल्हेर, देवास इत्यादि ठिकाणीं प्रसिद्ध असलेले "शीलनाथ" अखेर देह ठेवावयास गेले. नव्हे–देह ठेवलाच;


ते तसल्या योग्यांचें मोक्ष मार्गास जाण्याचें स्वर्गद्वार आहे. तीनतीनशें वर्षें, हजारों वर्षें तपश्चर्या करीत बसलेल्या सामर्थ्य-वान् साधकांचे तें साधना-स्थान आहे.

अखिल जगांतील पवित्र अशा त्या भारतभूमीचें तें शिखर आहे. स्वर्गातील नंदनवनाचा आनंद देणाऱ्या स्वयंभू सृष्टि-सौंदर्याचें तें मूर्तिमंत सौंदर्य आहे. ज्याचें पुरेपूर वर्णन करण्यास क्षणभर बृहस्पति देखील मंत्रमुग्ध होईल असें सर्व-व्यापी आनंदमय स्थान आहे. शेवटीं थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे तेहतीस कोटि देवांचाही देव पृथ्वीच्या उत्पत्तिकालापासून तपश्चर्या करीत बसला आहे असा तो पार्वतीमातेचा म्हणजे आदिशक्तीचा नाथ जो श्रीशंकर, त्या कैलासनाथाचें अखंड आनंद भोगण्याचें तें आनंदधाम आहे.

REFBK-0006001

मराठी ग्रं...
६००७

# तिबेट




१ अलमोरा ते कैलास (लिपुलेक रिंडीतून) ........ २३७ मैल.
२ ,, ते ,, (दारमा रिंडीतून) ........ २३३
३ ,, ,, ,, (उटाधरा रिंडीतून) ........ २०९
४ ल्हासा ,, ,, ........ ८००
५ कैलास प्रदक्षणा. ........ ३२
६ मानस सरोवराचा घेर ........ ५४
७ परखा ते ब्रम्हपुत्रा व सतलज नद्यांच्या उगमा पर्यंत ........ ९२
८ कैलास ते मानस सरोवर ........ १६
९ ,, ,, तीर्थापुरी ........ ३७
१० ,, ,, ग्यानीमामंडी ........ ४०

श्रीमत स्वामी रामानंद हिमालयांत बारा वर्षे वास्तव्य करीत असतांना वरील ठिकाणीं ते पांच वेळा जाऊन आले आहेत.